पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

14 वर्ष वर्धापन दिन

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१७ ■ बुधवार, दि.२७ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# ‘वोटर लिस्ट’ मधून नाव कट होणे म्हणजे नागरिकत्व जाणे नव्हे !

वृत्तसंस्था २७ मे

**नवी दिल्ली :** बिहार, पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या विशेष तपासणीवरून सुरू असलेल्या मोठ्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने आज आपला अंतिम आणि ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. निवडणूक आयोगाद्वारे राबवण्यात आलेल्या मतदार यादीच्या ’विशेष गहन पुनर्पडताळणी’ (एसआयआर) प्रक्रियेला न्यायालयाने पूर्णपणे वैध आणि संवैधानिक ठरवले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळताना स्पष्ट केले की, केवळ ही प्रक्रिया मतदार यादी सुधारण्याच्या सामान्य प्रक्रियेपेक्षा थोडी वेगळी आहे, म्हणून तिला ’अल्ट्रा वायर्स’ म्हणजेच बेकायदेशीर किंवा अवैध ठरवून रद्द करता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना नोंदवलेले ५ अत्यंत



महत्त्वाचे आहेत. न्यायालयाने म्हटले की, निवडणूक आयोग ही एक स्वायत्त आणि संवैधानिक संस्था आहे. देशात निष्पक्ष, पारदर्शक आणि बोगस मतदारांशिवाय शुद्ध मतदार यादी तयार करण्याचा पूर्ण अधिकार आयोगाला आहे. विशेष परिस्थितीमध्ये सामान्य प्रक्रियेपेक्षा वेगळी पद्धत अवलंबणे हे संविधानाच्या किंवा लोकप्रतिनिधी कायद्याच्या विरोधात नाही. त्यामुळे ‘एसआयआर’ मोहीम कायदेशीररीत्या पूर्णपणे योग्य आहे. बिहारमध्ये ही प्रक्रिया सुरू झाल्यानंतर, निवडणूक आयोगाने मतदारांची पडताळणी करण्यासाठी निश्चित केलेल्या अटींना आव्हान देण्यात आले होते. यावर न्यायालयाने सांगितले की, ’आयोगाने पडताळणीसाठी ११ अधिकृत दस्तऐवज निश्चित केले होते आणि नंतर आमच्या आदेशानुसार यात ’आधार कार्ड’चाही समावेश करण्यात आला. त्यामुळे निवडणूक आयोगाने मागितलेली कागदपत्रे मनमानी किंवा जाचक आहेत, हा

> गेल्या वर्षी निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदार याद्यांमधील त्रुटी आणि बोगस मतदारांना हटवण्यासाठी हे विशेष अभियान (एसआयआर) सुरू केले होते, ज्याला नंतर इतर राज्यांतही वाढवण्यात आले. या मोहिमेत २००२-२००३ च्या याद्यांशी कौटुंबिक संबंध सिद्ध करण्याची अट असल्याने वाद निर्माण झाला होता, ज्यावर आज सर्वोच्च न्यायालयाने अंतिम पडदा टाकला आहे.

याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आम्ही स्वीकारू शकत नाही.’ याचिकाकर्ते आणि विरोधी पक्षांनी असा आरोप केला होता की, निवडणूक आयोगाची ’एसआयआर’ मोहीम म्हणजे एका प्रकारे ’मागच्या दाराने केलेली नागरिकत्व तपासणी’ आहे. यावर कोर्टाने अत्यंत महत्त्वाची टिप्पणी केली. सुप्रीम कोर्टाने म्हटले की, ’या प्रक्रियेत एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून हटवले गेले, तर त्याचा अर्थ असा अजिबात होत नाही की त्या व्यक्तीचे भारताचे नागरिकत्व संपले आहे.’ या निकालामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. खंडपीठाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाचे अधिकार क्षेत्र मर्यादित आहे.

एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत जोडायचे की काढायचे, याच मर्यादेत आयोग नागरिकत्वाचा विषय पाहू शकतो. एखादी व्यक्ती भारताचा नागरिक आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नाही, तर ते काम केवळ संविधानाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे आहे. अदालतीने आपल्या निर्णयात स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाची ही विशेष मोहीम ’जन प्रतिनिधित्व अधिनियम’ आणि त्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करत नाही.

## युगांडावरून नागपुरात आलेली व्यक्ती ’होम आयसोलेशन’मध्ये!

प्रतिनिधी २७ मे

**नागपूर :** आफ्रिकी देशांमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या इबोलाच्या नव्या घातक विषाणूच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारच्या आदेशानंतर नागपूर विमानतळ हायअलर्टवर आले आहे. मंगळवारी युगांडावरून नागपुरात परतलेल्या एका ४७ वर्षीय प्रवाशाला खबरदारीचा उपाय म्हणून थेट २१ दिवसांसाठी ’होम आयसोलेशन’मध्ये ठेवण्यात आले आहे. संबंधित प्रवाशामध्ये सध्या कोणतीही लक्षणे नसली, तरी नागपूर महानगरपालिकेचे आरोग्य पथक पुढील २१ दिवस त्यांच्या प्रकृतीवर २४ तास बारीक लक्ष ठेवून असणार आहे. आफ्रिकी देशांमध्ये ’इबोला’ विषाणूच्या नव्या व अत्यंत घातक अशा ’बुन्डिबुग्यो’ स्ट्रेनचा प्रादुर्भाव वेगाने वाढत आहे.

## महायुतीत तिढा कायम !

### विधान परिषद निवडणूक ; उपमुख्यमंत्री शिंदे दिल्ली दरबारी

प्रतिनिधी २७ मे

**मुंबई :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जागावाटपावरून मोठा तिढा निर्माण झाला आहे. एकूण १७ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात जागांच्या वाटपावरून जोरदार राजकीय हालचाली सुरू आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने सुचवलेला जागावाटपाचा फॉर्म्युला शिंदे गटाने पूर्णपणे फेटाळून लावला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी थेट दिल्ली गाठल्याची माहिती समोर आली आहे. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वासोबत चर्चा करून शिवसेनेची भूमिका मांडणार असल्याचे सांगितले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भाजपने स्वतःकडे ११ जागा ठेवून शिवसेनेला ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागांचा प्रस्ताव दिला आहे. मात्र शिवसेनेने किमान ६ ते ७ जागांची मागणी करत नाराजी व्यक्त केली आहे. ठाणे, नाशिक, यवतमाळ आणि परभणी या जागा शिवसेनेसाठी प्रतिष्ठेच्या मानल्या जात असून या जागांवर कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याची भूमिका शिंदे गटाने घेतल्याचं सूत्रांचे म्हणणं आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात मुंबईत झालेली मॅरेथॉन बैठक निष्फळ ठरल्याची माहिती आहे. त्यानंतरच एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौरा केल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही पुणे आणि इतर काही जागांवरून धुसफूस सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता अमित शाह यांच्या मध्यस्थीनंतर महायुतीचा अंतिम जागावाटपाचा फॉर्म्युला काय ठरणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.




## राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत नाराजीनाट्य !

प्रतिनिधी २७ मे

**पुणे :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची बैठक पार पडली. पण या बैठकीला प्रफुल्ल पटेल उपस्थित नव्हते. बैठकीत सुनील तटकरे मुद्दे मांडत असताना मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र स्पष्टता येण्यासाठी आपण बोलणारच असल्याचं सुनील तटकरेंनी छगन भुजबळांना सांगितलं. ज्यानंतर या दोन नेत्यांमध्ये वाद झाला. तर सुनील तटकरेंच्या भाषणापूर्वीच पार्थ पवार बैठकीतून निघून गेले. त्यामुळे पक्षातील अंतर्गत मतभेद आता समोर आले आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या आणि पक्ष एकसंध असल्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवा, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या. तसंच पक्षात फूट पडणार असल्याच्या चर्चांवर त्यांनी नाराजी व्यक्त करत, २२ आमदार शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार असल्याच्या चर्चांमधून पक्षाची बदनामी केली जात असल्याचं म्हटलं.

### भुजबळ-तटकरे यांच्यामध्ये खडाजंगी

राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरे यांनी आपल्यावर आणि प्रफुल पटेल या ज्येष्ठ नेत्यांवर आणि पक्षावर टीका होत असताना पक्षातील इतर कोणताही नेता किंवा नेतृत्व आमचे समर्थन करत नसल्याची खंत यावेळी व्यक्त केली गेली. अजितदादांच्या निधनानंतर आम्ही पक्ष वाढवत असताना आम्ही दोघेच टिकेचे धनी का? असा सवालही सुनील तटकरेंनी केला. सुनील तटकरे यांच्या या मुद्यावर छगन भुजबळांनी आक्षेप घेतला. जे झाले ते झाले ते सोडून द्या आता पुढे जाऊया असा सल्ला भुजबळ यांनी तटकरे यांना दिला. त्यावरुन दोघात खडाजंगी झाल्याचे म्हटले जात आहे.

### छगन भुजबळ यांचे स्पष्टीकरण

छगन भुजबळ यांनी बैठकीनंतर सांगितले की, ‘कोणताही वाद झालेला नाही. आमच्या राष्ट्रवादीची बैठक सुरू होती तेव्हा आम्हाला समितीच्या बैठकीसाठी देखील फोन येत होते. काहीतरी कारण असेल. काही खडाजंगी अजिबात झालेली नाही, आम्हाला या बैठकीसाठी सारखे फोन येत होते. त्यामुळे मी मुद्याचं पटकन बोला असं म्हणालो, कुठलाही वाद झाला नाही. कुठलाही ‘एकला चलो’चा नारा कोणीही दिलेला नाही.

## ‘गॉड’ तेजस शाहसह डॉ. मनोज शिरूरेला अटक

प्रतिनिधी २७ मे

**पुणे :** देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती दिवसागणिक वाढत आहे. या प्रकरणी सीबीआयकडून राज्यभरात मोठ्या कारवाईचे सत्र सुरु असून आता या प्रकरणात आणखी दोघांना अटक करण्यात आली आहे. ‘गॉड’ म्हणून नंबर सेव्ह केलेल्या तेजस शाह याला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. त्याने मनिषा हवालदारकडून पेपर घेतल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे.

पुण्यातून सीबीआयने अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून मनोज शिरुरे असे त्याचे नाव आहे. डॉ. मनोज शिरूरे याला सीबीआयने आज अटक केली आहे. तर तेजस शाह याला काल अटक करण्यात आली. सध्या अटक आरोपींची संख्या १३ वर पोहचली आहे. लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे याच्यावर रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप आहे. तर पुण्यातील एपीएमए कोचिंग संस्थेतील भौतिकशास्त्र शिक्षक तेजस हर्षदकुमार शाह याच्यावर भौतिकशास्त्राचे लीक प्रश्न मिळवल्याचा आरोप करण्यात आला आहे. देशभरातील ४९ ठिकाणी सीबीआयने छापे टाकले असून तपासात अनेक कागदपत्रे, लॅपटॉप आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे.













सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. २७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# मुर्तिजापूर नगर परिषदेची हद्दवाढ; विकास की कराचा बोजा?

## कृष्णराव गावंडे यांचा सवाल

प्रतिनिधी २७ मे

**मूर्तिजापूर :** शहराचा विकास हा नागरिकांच्या मूलभूत गरजांपासून सुरू व्हायला हवा की फक्त कागदावरच्या हद्दवाढीतून? असा थेट आणि टोचणारा प्रश्न माजी नगरसेवक तथा जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य कृष्णराव गावंडे यांनी उपस्थित करत हद्दवाढीच्या मुद्द्यावर जोरदार भूमिका मांडली आहे. त्यांच्या वक्तव्यानंतर शहरात आणि आसपासच्या ग्रामीण भागात या विषयावर तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

गावंडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शासनात ग्रामविकास व नगरविकास अशी स्वतंत्र मंत्रालये असताना, तसेच पंतप्रधानांपासून ते ग्रामपंचायतीपर्यंत अनेक यंत्रणा ग्रामीण विकासासाठी कार्यरत असताना, नगर परिषदेची हद्द वाढवण्यामागील खरा उद्देश काय आहे? हा प्रश्न सर्वसामान्य ग्रामस्थांना पडला आहे.



दरम्यान, शहरातील विदारक परिस्थिती अधोरेखित करत त्यांनी प्रशासनावर टीका केली. 'आजही नागरिकांना आठ-आठ, दहा-दहा दिवस पिण्याचे पाणी मिळत नाही. कचरा व्यवस्थापन पूर्णतः ढासळले आहे. जागोजागी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात. शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये मूलभूत सुविधा नाहीत, सार्वजनिक स्वच्छतागृहे नाहीत. अशा परिस्थितीत हद्दवाढ करून नवीन भागांना आपण काय देणार?' असा भावनिक सवाल त्यांनी उपस्थित केला.

हद्दवाढीमुळे शहराभोवतीच्या ल, शिरसो, हातगाव, चिखली, सोनोरी या ग्रामपंचायती बरखास्त होण्याची शक्यता असून, त्या भागातील नागरिकांवर नगरपरिषदेप्रमाणे वाढीव घरपट्टी व इतर करांचा बोजा पडणार असल्याचे गावंडे यांनी सांगितले. 'हा सगळा खटाटोप नगरपरिषदेच्या तिजोरीत अधिक महसूल जमा करण्यासाठीच तर नाही ना?' अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी झालेल्या हद्दवाढीच्या प्रयत्नालाही गावंडे यांनी जनजागृती करून विरोध केला होता. आता पुन्हा हाच विषय पुढे आल्याने त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, 'ही हद्दवाढ ग्रामीण जनतेची मागणी नसून ती त्यांच्यावर लादली गेल्यास तीव्र जनआंदोलन उभे राहील असा इशारा दिला.

# आईवर लोखंडी सब्बलने प्राणघातक हल्ला करणाऱ्या मुलास चार वर्षांची सक्तमजुरी

## अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

प्रतिनिधी २७ मे

**अकोला :** किरकोळ कारणावरून स्वतःच्या आईवर लोखंडी सब्बलने हल्ला करून गंभीर जखमी करणाऱ्या आरोपी मुलास माननीय अतिरिक्त सत्र न्यायालयाने चार वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

अकोट फाईल पोलीस स्टेशन येथे आरोपी संजय पुंडलिक खंडारे याच्याविरुद्ध भा.दं.वि. ३०२, ३२५ व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी महिला लहान मुलगा संजय खंडारे याच्यासोबत राहत होत्या. आरोपी हा दारूचा व्यसनाधीन असून पत्नी त्याला सोडून गेली होती.

११ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी फिर्यादीने मोबाईल रिचार्ज करण्यासाठी बाहेर जाण्याबाबत आरोपीस सांगितले असता आरोपी संतापला. त्यानंतर त्याने घरातील लोखंडी सब्बल हातात घेऊन फिर्यादीच्या डोक्यावर व डाव्या हातावर वार करून गंभीर जखमी केले. आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक धावून आल्यावर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. जखमी महिलेला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्यानंतर सदर गुन्ह्यात भा.दं.वि. कलम ३०२ ची वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाची सुनावणी तेजवंत सिंग ए. संधू, ॲडहॉक जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला यांच्या न्यायालयात झाली. प्रकरणातील साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे व इतर दस्तऐवजी पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी संजय पुंडलिक खंडारे यास भा.दं.वि. कलम ३२६ अंतर्गत दोषी ठरविले.

प्रकरणात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता मंगेश मानकर व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता क्षितीज अनोकार यांनी साक्षीदारांची प्रभावी पडताळणी केली. प्रकरणातील अंतिम युक्तिवाद अतिरिक्त सरकारी अभियोक्ता मंगेश मानकर यांनी केला. सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपीचा गुन्हा न्यायालयासमोर सिद्ध झाल्याने न्यायालयाने दोषसिद्धीचा आदेश पारित केला. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी एएसआय सुनील दीपकवार, एएसआय अनवर खान (CMS सेल) तसेच एएसआय धनभर यांनी सरकारी वकिलांना खटला चालविताना सहकार्य केले.

# अकोट माळी महासंघाच्या वतीने प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



प्रतिनिधी २७ मे

**अकोट :** माळी महासंघाच्या संघाच्या वतीने समाजातील दहावी व बारावीत मेरीट लिस्ट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा आई-वडिलांसह गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख सत्कारमूर्ती अविनाश ठाकरे राष्ट्रीय अध्यक्ष माळी महासंघ तसेच प्रमुख पाहुणे रवींद्र अंबडकार राष्ट्रीय सचिव , राजेश जावरकर विभागीय अध्यक्ष, दिपक खलोकार अकोला जि. अध्यक्ष ,प्रथमेश बोरोडे आकोट उपनगराध्यक्ष, सौ निकिता सचिन जुनगरे नगरसेविका, अचल बेलसरे नगरसेवक , राधेश्याम बहादुरे वै.आ.वि. अध्यक्ष, अमरावती कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश गणगणे महासचिव महाराष्ट्र प्र.काँ. क., स्वप्निल सोनार म. फु. बँक मॅनेजर, कार्यक्रमाचे वेळ बुधवार २७ दुपारी ४ वाजता स्थळ राम नारायण मंगल कार्यालय कालवाडी रोड अकोट, या गुणगौरव सोहळ्याचे आयोजक माळी महासंघ अकोट तालुका जिल्हा कार्यकारणी, युवा आघाडी कार्यकारणी, अकोट तालुका कार्यकारणी, अकोट शहर कार्यकारणी , व सर्व माळी महासंघ पदाधिकारी तसेच नितीन शेगोकार, हर्षल खाजबागे, अतुल लोखंडे, पवन बेलसरे, रवींद्र पोटदुखे, कमलेश यावले, रोहित नाथे. कार्यक्रमाला विशेष मार्गदर्शक निलेश हाडोळे, प्रकाश गायकी, सुनील अंबडकार ,नंदकिशोर शेगोकार ,मंगेश चिखले, केशव बिलबिले, जगन बगाडे ,अजय अडोकार, मनोज झाडे, शंतनु लोखंडे, सचिन बेलोकार, विजय नवले, अनुप अंबळकार, प्रणित खलोकार, ऋषिकेश सुपासे, सचिन काळे उपस्थित राहतील. सोहळ्याला गुणवंत व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

# शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने दक्षता घ्यावी



**अकोला :** राज्यातील शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने काही दक्षता घ्याव्या, या आशयाचे निवेदन सनातन संस्कृती महासंघातर्फे राज्याच्या शिक्षण मंत्र्यांना जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत देण्यात आले. निवेदनात म्हटले की, गेल्या काही वर्षांपासून शैक्षणिक संस्थांचे पेव फुटले आहे. गल्लीबोळात कॉन्व्हेंटच्या पाट्या दिसतात. खाजगी विनाअनुदानित शाळांवर शिक्षण विभागाचे थेट नियंत्रण नाही. शाळांची इमारत कोसळून विद्यार्थी व विद्यार्थीनींनी जीव गमावल्याचे, तसेच मानसिक आणि शारीरिक अत्याचाराला बळी पडल्याच्या बातम्या वृत्तवाहिन्यांवरुन बघण्यात तसेच वृत्तपत्रातून वाचण्यात येतात.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता तसेच आरोग्याच्या दृष्टीने सर्व शासकीय तसेच खासगी शाळांच्या इमारतींचे नियमानुसार स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. अग्निशमन व्यवस्था असावी, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, तसेच मुलामुलींसाठी व्यवस्थित प्रसाधनगृह असावे. शाळांच्या दुसऱ्या आणि त्या वरील मजल्यांच्या व्हरांड्यांचे कठडे व फेन्सिंग वॉल व्यवस्थित उंचीचे असावेत. संपूर्ण शाळेचा परिसर, कार्यालय, वर्ग, प्रयोगशाळा, वाचनालय, अभ्यासिका सी सी टिव्ही च्या कक्षेत असाव्यात. सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. ज्यात महिला सुरक्षा रक्षक देखील असाव्या. त्यांची चारित्र्य पडताळणी करून घेण्यात यावी. विद्यमान सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती बद्दल तज्ञ व्यक्तीं कडून विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात यावे. सर्व जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी, खाजगी शाळांचे व्यवस्थापक यांना विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि आरोग्याच्या दृष्टीने शाळेत वरील प्रमाणे व्यवस्था करण्याबाबतचे निर्देश देण्यात यावेत अशी विनंती शिक्षण मंत्र्यांना करण्यात आली आहे. निवेदन देताना महासंघाचे हेमंत जकाते, मनोज अग्रवाल, नरेंद्र कराळे, महेश शाह, धवल प्रजापत, मोहित नायसे, अर्जुन किर्तीवार, अभीजीत कराळे, ऋषीकेश जकाते आदी कार्यकर्ते उपस्थित असल्याचे प्रसिद्धी प्रमुख विजय केंदरकर यांनी कळवले.

# हिवरखेड प्रभाग २ मधील नाल्यासफाई करा

## स्थानिक रहिवाशांची निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी २७ मे



**हिवरखेड :** येथील प्रभाग क्रमांक २ मधील रहिवासी असलेले सागर उरकडे यांनी थेट निवेदनातून नगरपरिषद मुख्य अधिकारी व नगराध्यक्षा यांना अर्ज केला असून अर्ज आवक जावक कर्मचारी याच्याकडे सोपविला अर्जातून मागणी करण्यात आली,

आमच्या वस्तीतील सांडपाण्याच्या नाल्यातील घाणीचे पाणी आमच्या घरात शिरते त्यामुळे आम्हा नागरिकांना दुग्रधीचां त्रास सहन करावा लागतो, कोणीच याकडे लक्ष देत नाही, नाले सफाई करणारे येतात थूतूर मातुर तात्पुरत्या स्वरूपात सफाई करतात नंतर महिना भर येतच नाहीत, त्यामुळे सर्व घाणीचे पाणी येथील पुलांखाली जमा होते आणि पाणी पुलाच्या वर जाते, सबंधिताने हा पूल मोठा करून नाल्या स्वच्छ सफाई कराव्या जेणेकरून आम्ही सामान्य नागरिकांचा त्रास कमी होईल, या प्रभागातील ही समस्या केव्हा मार्गी लागेल याकडे या वस्तीतील रहिवांचे लक्ष लागले.

# प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन प्रणीत मोरे यांचा ३० मे रोजी 'द हेरिटेज' मध्ये भव्य कार्यक्रम

प्रतिनिधी २७ मे



**अकोला :** या धावपळीच्या आणि दगदगीच्या आयुष्यात हसणे खूप गरजेचे असते. हसणे आरोग्यासाठी उत्तम मानले जाते. तुम्हा सर्वांना हसवण्यासाठी आणि तुमचा ताणतणाव दूर करण्यासाठी प्रसिद्ध लाईव्ह स्टँड-अप कॉमेडियन प्रणीत मोरे यांचे शहरात ३० मे रोजी आगमन होत आहे. शहराच्या रिधोरा रोडवर असलेल्या प्रसिद्ध 'द हेरिटेज' येथे त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जर तुम्ही प्रणीत मोरे यांचे चाहते असाल, तर या सर्वात मोठ्या 'कॉमेडी नाईट'साठी सज्ज व्हा! या कार्यक्रमासाठी सोमवारपासून तिकीट विक्री सुरू झाली असून ती बुधवारपर्यंत सुरू राहणार आहे. विशेष म्हणजे, या कालावधीत आयोजकांकडून तिकिटांवर डिस्काउंट देखील दिली जात आहे.तिकिटांच्या श्रेणी फॅनपिट, प्लॅटिनम, गोल्ड, सिल्वर अशा आहेत. कार्यक्रमासाठी जागा मर्यादित असल्यामुळे लवकरात लवकर तिकीट बुक करून ही सुवर्णसंधी गमावू नका असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आणि तिकीट बुकिंगसाठी तुम्ही ८२३७९००२९७ या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

प्रणीत मोरे यांच्या विनोदी शैलीची सर्वांनाच भुरळ पडली आहे. तरुण पिढीशी संवाद साधण्याची त्यांची कला प्रेक्षकांना विशेष आवडते.

आतापर्यंत मुंबई, पुणे, नागपूर आणि महाराष्ट्रातील अनेक प्रमुख शहरांमध्ये त्यांनी आपल्या शोच्या माध्यमातून लोकांना खळखळून हसवले आहे. त्यांची सर्वात मोठी खासियत म्हणजे, ते जेवढ्या तयारीने मंचावर आपली कला सादर करतात, त्याहून अधिक वेगाने समोर बसलेले प्रेक्षक आणि आजूबाजूच्या वातावरणातून उत्स्फूर्तपणे विनोद निर्माण करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. त्यामुळे अजिबात उशीर करू नका, आजच आपले तिकीट बुक करा आणि या धमाकेदार कार्यक्रमाचा भरपूर आनंद घ्या असे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोला जिल्ह्यात 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाची उत्साहात सुरुवात

**अकोला :** राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या विशेष अभियानाची अकोला जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पंचगव्हाण येथे नुकतेच भव्य आरोग्य तपासणी व दंत तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

२२ मे २०२६ रोजी झालेल्या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवून आरोग्य तपासणी करून घेतली. शिबिराचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिरास सुरुवात झाली.

या विशेष शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये दंत तपासणी, दातांचे आजार व उपचार, डोळ्यांची तपासणी,ई.सी.जी. तपासणी तसेच इतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. सदर शिबिरामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश अंबरते यांनी नागरिकांना आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याबाबत आरोग्य शिक्षण दिले. तसेच 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाची माहिती देऊन गाव आरोग्यदायी व रोगमुक्त करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गट प्रवर्तक किरण बावस्कर,आरोग्य सहाय्यक साहेबराव रावणकर, गायकवाड आरोग्य सेविका,सेवक सर्व आशा स्वयंसेविका तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आगर परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## ट्रॅक्टर चोरीचा काहीही तपास नाही

**हातरूण :** खरीप हंगामाची तयारी करावी तर ट्रॅक्टर चोरीला गेले. पंधरा दिवस होऊन तपास नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. बाळापूर तालुक्यातील आगर भागात चोरांनी थैमान घातले तर, पोलिस प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे चोरट्यांचे मनोबल वाढल्याचा आरोप संतप्त शेतकरी व नागरिक करीत आहेत. ट्रॅक्टर, ट्रॉली, वाहनातील बॅटरी व साऊंड, बैलजोडी, गाय-वासरे यांसारखा लाखो रुपयांचा मुद्देमालाची चोरी होत आहे.

काही दिवसांपूर्वी शेतकरी चेतन नामदेवराव फुकट यांच्या मालकीचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली रात्रीच्या अंधारात अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. मात्र, पोलिसांना त्याचा मागमूसही नाही. यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासंदर्भात संतप्त प्रतिक्रिया देताना संबंधित शेतकरी म्हणाले, आम्ही गावोगावी फिरून ट्रॅक्टर शोधत आहोत. तक्रार दिल्यानंतरही पोलिस केवळ कागदोपत्री तपास दाखवत आहेत. प्रत्यक्षात चोरटे मोकाट फिरत आहेत.

तसेच त्यांनी पुढे सांगितले, १३ मे रोजी पोलिस ठाण्यात तक्रार देऊनही आजपर्यंत आरोपींचा कुठलाही शोध लागलेला नाही. प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई दिसत नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढत असून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर ट्रॅक्टर चोरी प्रकरणातील तक्रारदार चेतन फुकट यांनी पोलिस प्रशासनावरच सवाल उपस्थित केला. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे आगर परिसरातील शेतकरी भयभीत झाले असून शेतातील जनावरे, घरासमोरील ट्रॅक्टरही सुरक्षित नसतील तर आम्ही जगायचे कसे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## निधन वार्ता

**रुपेश भरक्षे**



**हिवरखेड :** येथील लोकजागर मंचचा कार्यकर्ता रुपेश डिगांबर भरक्षे ह्याचे पुणे येथे झालेल्या भिषण रस्ता अपघातात निधन झाले. त्याच्या पश्चात आई -वडील, भाऊ व बराच मोठा मित्र परिवार आहे. अपघातात त्याच्या मित्राचाही मृत्यू झाला.

# करूणेचा महासागर रमाबाई आंबेडकर; आज माता रमाई यांची जयंती

रमाबाई भीमराव आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ मध्ये वणंद गाव येथे झाला होता. त्यांचा रमाबाई ते रमाई हा जीवनप्रवास अनेक कष्टप्रद घटनांनी भरलेला असतानाही त्या करूणेचा महासागर होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत्या. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. रमाबाई आंबेडकर यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकू धुत्रे (वलंगकर) व आई रुक्मिणी यांच्यासह रमाबाई दाभोळजवळील वंणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ (शंकर) होता. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकू दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असे. त्यांना छातीचा त्रास होता. रमा लहान असतानाच त्यांच्या आई यांचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकू यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले.

सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमराव नामक मुलासाठी वधू पाहत होते. सुभेदारांना भायखळा मार्केटजवळ राहणाऱ्या वलंगकरांकडे लग्नाची मुलगी असल्याचे समजले. सुभेदारांना रमा पसंत पडली त्यांनी रमाच्या हाती साखरेची पुडी दिली.



रमाई व भीमरावांचे लग्न भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये १९०६ या वर्षी झाले. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय १४ वर्षे तर रमाईचे वय ९ वर्षे होते. त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात लग्न मंडप तसेच पंचपक्वान्नाच जेवण, झगमग रोशनाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हे लग्न पार पडले. माता रमाई यांनी जीवनात फारच दुःख सहन करावे लागले.

१९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी, अडचणींशी, गरिबीशी भांडत होती. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई. रमाईने अनेक मरणे पाहिली. प्रत्येक मरणाने तीही थोडी थोडी मेली. मरण म्हणजे काय कळत नव्हते त्या वयात आई-वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू. १९१४ ते १९१७ साली बाबासाहेब अमेरिकेला असताना रमेशचा मृत्यू. ऑगस्ट १९१७ मध्ये बाबांची सावत्र आई जिजाबाईचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, व १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले. रमाई एकट्या पडल्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या.. सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीमपर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नी शेण वेचते म्हणून लोक नावे ठेवतील. म्हणून पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८.०० नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असत. मुलांसाठी उपास करत असत. अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत केली. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज मुंबई बंदरात आला. रमाईला नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती म्हणून त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या.

### रमाबाई ते रमाई

एकदा बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते पण रमाईला एकटी घरामध्ये कसे राहायला ठेवायचे म्हणून बाबासाहेब धारवाडच्या त्यांच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. ते वराळे काका धारवाडमध्ये लहान मुलांचे वसतीगृह चालवत असत. त्या वसतीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ते लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाई वराळे काका यांना विचारते दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात का आली नाही. त्यावेळी वराळे म्हणाले ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वसतीगृहाला जे अन्न धान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. वराळे अगदी कंठ दाटून ते म्हणाले, त्यावेळी रमाई लगेच आपल्या खोलीमध्ये जातात आणि रडत बसतात आणि कपाटातला सोन ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात आणि लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण करतात. खूप आनंदी राहतात. हे पाहून रमाई खूप आनंदी होते.तिचा आनंद गगनात मावत नव्हता.मग त्यावेळी ही सगळी लहान मुले रमाबाई यांना 'रमाआई' म्हणून बोलायला लागतात. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळ्यांची आई झाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २७ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# महागाव तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारांचा तडाखा

## टीनशेड उडाले, वासराचा मृत्यू; अनेक घरांचे नुकसान

प्रतिनिधी २७ मे



**महागाव :** महागाव तालुक्यातील सवना, वाकोडी व खडका परिसरात सोमवारी सायंकाळी अचानक वातावरणात बदल होऊन जोरदार पाऊस, वादळी वारे आणि तुरळक गारपिटीने मोठा तडाखा दिला. या अवकाळी संकटामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक भागांतील जनजीवन विस्कळीत झाले.

वादळी वाऱ्यांचा वेग इतका प्रचंड होता की, सवना गावातील अनेक घरांवरील टीनपत्रे उडून गेली. गावालगतच्या शेतात शेतकरी गोपाळ देशमुख यांच्या शेतातील टीनशेड अक्षरशः उडून गेले. शेडमध्ये बांधून ठेवलेल्या गायीच्या वासराचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच सैय्यद गफार सैय्यद याशिन यांच्या म्हशीचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अवकाळी पावसासह झालेल्या गारपिटीमुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले. शेतकरी गोपाळ सरसमकर यांच्या शेतातील सुमारे तीन हजार केळीची झाडे वादळी वाऱ्याने उन्मळून पडली. तसेच डॉ. उदय करोडकर आणि पंजाबराव चव्हाण यांच्या केळी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

अचानक पडलेल्या गारांमुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही भागांत विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यामुळे वीज खांब पडल्याने वीजपुरवठाही खंडित झाला.

घटनेची माहिती मिळताच महागावचे तहसीलदार अभय मस्के यांनी दूरध्वनीद्वारे माहिती घेत संबंधित तलाठी व महसूल अधिकारी उईके यांना घटनास्थळी जाऊन पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळी पावसामुळे नव्या संकटाचे सावट निर्माण झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तातडीने मदत देऊन पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पुसदमध्ये अवैध सावकारीवर मोठी कारवाई; ९८ आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त

## सहा पथकांची संयुक्त धाड; कोरे धनादेश, स्टॅम्पपेपर, डायऱ्यांसह दस्तऐवज ताब्यात





प्रतिनिधी २७ मे



**यवतमाळ :** अवैध सावकारी व्यवहारांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत सहकार विभागाच्या सावकारी पथकाने मंगळवारी पुसद शहर व परिसरात मोठी धाडसत्र मोहीम राबविली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत तब्बल ९८ आक्षेपार्ह कागदपत्रे, कोरे धनादेश, स्टॅम्पपेपर, डायऱ्या, खरेदीखत व अन्य महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले. सहकार, महसूल, कृषी विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली.

सहाय्यक निबंधक तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पुसद कार्यालयाकडे दाखल झालेल्या तक्रारींच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. रोहित बाळासाहेब सुरोशे यांच्या तक्रारीवरून यशवंत बाबुराव पल्लेवार, रा. उदासी वार्ड, पुसद यांच्या राहत्या घरी झडती घेण्यात आली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या या कारवाईत १८ आक्षेपार्ह कागदपत्रे, कोरे धनादेश व इतर दस्तऐवज जप्त करण्यात आले.

तसेच भालचंद्र अच्युतराव धुमाळ यांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर सुनिल राजेश्वर कोमरवल्लीवार, निता सुनिल कोमरवल्लीवार, विठ्ठल शंकर लाड आणि दिलीप शंकर लाड यांच्या घर व दुकानांवर छापे टाकण्यात आले. ग्रीन पार्क परिसरातील घरासह रोहडा येथील घर आणि दुकानांवरही पथकाने झडती घेतली. या कारवाईदरम्यान ६० कागदपत्रे, खरेदीखत, डायऱ्या तसेच अन्य २० दस्तऐवज, स्टॅम्पपेपर आणि चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या.

जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुरू असून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याची माहिती सहकार विभागाने दिली.

सहाय्यक निबंधक के. एस. मस्के यांच्या नियोजनाखाली सहा सावकारी पथकांनी पुसदमधील सहा ठिकाणी एकाचवेळी कारवाई केली. या पथकांमध्ये सहकार विभागातील अधिकारी, महसूल विभागाचे ग्राम महसूल अधिकारी, कृषी विभागाचे कर्मचारी, पोलीस प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तसेच व्हिडीओ फोटोग्राफर सहभागी होते.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा सनियंत्रण समितीचे अध्यक्ष, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था आणि तहसीलदार पुसद यांच्या मार्गदर्शनाखाली ही संयुक्त कारवाई पार पडली. अवैध सावकारी व्यवहारांविरोधात यापुढेही कठोर मोहिम सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# इंधन दरवाढीविरोधात पुसदमध्ये महाविकास आघाडीचे आंदोलन

## पेट्रोल पंपावर चॉकलेट वाटप करून केंद्र सरकारचा निषेध

प्रतिनिधी २७ मे



**पुसद :** केंद्र सरकारच्या इंधन दरवाढीविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने पुसद येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि वाहनधारकांचे आर्थिक कंबरडे मोडले असल्याचा आरोप करत आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात विविध मागण्यांचे फलक घेत "इंधन दरवाढ कमी करा", "महागाईला आळा घाला", "सामान्य जनतेला दिलासा द्या" अशा घोषणा दिल्या. यावेळी पेट्रोल पंपावर येणाऱ्या वाहनधारकांना चॉकलेट वाटप करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने निषेध नोंदविण्यात आला.


यावेळी उपस्थित नेत्यांनी इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याचा आरोप केला. वाहतूक खर्च वाढल्याने सर्वच वस्तू महाग झाल्या असून सामान्य नागरिकांचे जगणे कठीण बनले आहे. केंद्र सरकारने जनतेच्या हिताचा विचार करून पेट्रोल व डिझेलवरील कर तातडीने कमी करावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

आंदोलनाचे नेतृत्व महाविकास आघाडीचे नेते शरदभाऊ मैद, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिनभाऊ नाईक आणि शिवसेनेचे मोहन विश्वकर्मा यांनी केले.

यावेळी स्वप्नील जयस्वाल, शहराध्यक्ष झिया शेख, प्रवीण कदम, जुनेद शेख, काँग्रेस तालुकाध्यक्ष विलास वाघमारे, रवी पांडे, वैभव सुने, ज्ञानदीप कांबळे, विजय बाबर, ॲड. विघ्ने, युवा काँग्रेसचे सुजित मानकामे, नगरसेवक जब्बार लाखे, गाझी ओसामा, फिरोज खान, इर्शाद कुरेशी, प्रकाश नेमायते, अभिलाष खैरमोडे यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# कलगाव येथे विनापरवाना लावलेले भोंगे हटवले

प्रतिनिधी २७ मे



**दिग्रस :** उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी दिग्रस पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली असून मंगळवारी ग्राम कलगाव येथील दोन धार्मिक स्थळांवरील विनापरवाना लावलेले लाऊडस्पीकर व भोंगे हटविण्यात आले.

उच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक ४७२९/२०२१ तसेच राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाच्या आदेशानुसार ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २०००, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विनापरवाना लावलेल्या भोंग्यांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तथा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिग्रस पोलिसांनी ग्राम कलगाव येथे मोहीम राबविली.

यावेळी श्री महादेव मंदिर संस्थान आणि श्री राधाकृष्ण मंदिर येथील विनापरवाना लावलेले स्पीकर व भोंगे स्वेच्छेने हटविण्यात आले. या कारवाईत मंदिर विश्वस्त रमेश किसनराव राऊत, सुनील जगदीश रननवले, पोलीस पाटील सुनील राऊत, तंटामुक्ती समिती पदाधिकारी व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

दिग्रस पोलिसांनी सर्व धार्मिक व सामाजिक संस्थांच्या विश्वस्तांना विनापरवाना लावलेले स्पीकर स्वयंस्फूर्तीने काढून कायदेशीर कारवाई टाळण्याचे आवाहन केले आहे.

# आर्णीत नगरसेवकावर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी २७ मे

**आर्णी :** आर्णी नगरपरिषद परिसरातच एका नगरसेवकावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना रविवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी पवन सुरेश चाफले यांच्या तक्रारीवरून ओम सुरेश सवई व एका अनोळखी इसमाविरुद्ध आर्णी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन चाफले (वय २७) हे आर्णी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक आहेत. दि. २५ सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ते नगरपरिषद कार्यालयात असताना त्यांना हिमांशू सरगम यांचा दूरध्वनी आला. "तुझ्या मेव्हण्याला समजावून सांग," असे बोलणे सुरू असताना आरोपी ओम सवई याने फोन घेत "तू कुठे आहेस?" अशी विचारणा केली. त्यावर चाफले यांनी आपण नगरपरिषद कार्यालयात असल्याचे सांगितले.

### पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करावी : निलेश गावंडे



■ "नगरपरिषद हद्दीत लोकप्रतिनिधींवरच हल्ले होत असतील तर सर्वसामान्य नागरिकांचे काय? पोलीस प्रशासनाने गावगुंडांवर तातडीने कारवाई करून त्यांचा बंदोबस्त करावा," अशी मागणी उपनगराध्यक्ष निलेश गावंडे यांनी केली.

यानंतर काही वेळातच आरोपी ओम सवई व त्याच्यासोबतचा एक अनोळखी इसम नगरपरिषद परिसरात दाखल झाले. दोघांनीही चाफले यांची कॉलर पकडून त्यांना जबरदस्तीने इमारतीबाहेर ओढून नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर जातीवाचक व अश्लील शिवीगाळ करत "तू आदिवासी आहेस, तुझी औकात आहे का नगरसेवक बनायची?" अशी धमकी दिल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.

दरम्यान, आरोपींनी चाफले यांना जमिनीवर पाडून लोखंडी रॉडने डोक्यावर वार केल्याने ते जखमी झाले. तसेच जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी आर्णी पोलिसांनी अप.क्र. ४३१/२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), २९६, ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. देवानंद मुनेश्वर करीत आहेत. घटनेनंतर राजकीय व सामाजिक स्तरावर संताप व्यक्त केला जात असून, नगरपरिषद परिसरातच लोकप्रतिनिधीवर हल्ला झाल्याने नागरिकांमध्येही असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

# कधी मिळणार विमा ? शेतकऱ्यांची आर्त हाक

## "तेल गेले, तूप गेले; हाती धुपाटणेच आले" अशी शेतकऱ्यांची अवस्था

प्रतिनिधी २७ मे

**उमरखेड :** पिक विमा हा शेतकऱ्यांच्या हक्काचा असूनही यवतमाळ जिल्ह्यासह उमरखेड तालुक्यातील अनेक शेतकरी अद्याप विम्याच्या लाभापासून वंचित असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही विमा न मिळाल्याने "तेल गेले आणि तूप गेले, हाती धुपाटणेच आले" अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

> ■ अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे पालकमंत्री संजय राठोड, आमदार किसन वानखेडे, काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे तसेच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी नुकसानीची पाहणी केली होती. तातडीने पंचनामे करून कोणताही शेतकरी विम्यापासून वंचित राहू नये, असे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले होते. तरीही अनेक शेतकऱ्यांना अद्याप विमा मिळालेला नाही.

गत वर्षी जुलै ते ऑक्टोबर दरम्यान उमरखेड तालुक्यात मुसळधार पाऊस झाला होता. अनेक भागांमध्ये नदी-नाल्यांना पूर आल्याने शेती जलमय झाली होती. सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, तूर, ऊस, हळद तसेच भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही ठिकाणी पिकांसह सुपीक मातीही वाहून गेली होती. पैनगंगा नदीकाठच्या ४२ गावांमध्ये परिस्थिती गंभीर होती. अनेक शेतांमध्ये आठ-आठ दिवस पाणी साचून राहिले होते.

शासनाने पिक विमा योजना सुरू केल्यानंतर शेतकऱ्यांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने विमा भरला. नुकसान झाल्यास विम्याचा आधार मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात यवतमाळ जिल्हाच विमा लाभातून वगळल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना विमा मंजूर होत असताना विदर्भातील शेतकऱ्यांवर अन्याय का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नैसर्गिक आपत्ती, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे आधीच त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांमध्ये शासनाविषयी संताप व्यक्त होत आहे. "लोकप्रतिनिधी कमी पडले की विमा कंपन्यांशी संगनमत आहे?" असा सवालही शेतकरी उपस्थित करत आहेत.

शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तात्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांच्या पिक विम्याचा प्रश्न मार्गी लावावा, तसेच पात्र शेतकऱ्यांना त्वरित विमा मिळावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# गोरक्षक हत्या प्रकरणी सहा आरोपी अटकेत

## फरार आरोपींच्या शोधासाठी एलसीबीसह पाच पथके तैनात; सहा आरोपींना २९ मेपर्यंत पोलीस कोठडी

प्रतिनिधी २७ मे



**उमरखेड :** महागाव–उमरखेड मार्गावरील सुकळी येथे गोरक्षक गजानन सुरोशे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह सहा जणांना अटक केली असून न्यायालयाने सर्व आरोपींना २९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या गुन्ह्यातील फरार आरोपींच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी)सह पाच विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

२३ मेच्या मध्यरात्री गोवंश तस्करी करणाऱ्या वाहनांचा बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून पाठलाग सुरू होता. यावेळी गजानन सुरोशे यांनी आपल्या चारचाकी वाहनातून तस्करांच्या वाहनाचा पाठलाग केला. दरम्यान, तस्करांच्या वाहनाचा टायर फुटल्याने वाहन सुकळी गावाजवळ थांबले. त्यानंतर आरोपींनी गजानन सुरोशे यांच्या वाहनावर मोठमोठ्या दगडांनी व लाकडांनी हल्ला करून त्यांची निर्दयी हत्या केली.

या घटनेनंतर उमरखेड व महागाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार शंकर पांचाळ व पोलीस पथकांनी तातडीने तपास सुरू केला. घटनेनंतर अनेक संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी मुख्य आरोपी शेख सुलतान शेख अल्लावली (वय २७, रा. सुकळी) याला अवघ्या ४८ तासांत अटक केली. त्यानंतर आणखी पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहम्मद परवेज मोहम्मद शफी (वय २४, रा. रहीमनगर, उमरखेड), निरोद्दीन इक्रोमोद्दीन काजी (वय ३०, रा. सुकळी), शेख अजगर अहमद अब्दुल हमीद (वय २८, रा. सुकळी), नोमोदोद्दीन रियाजोद्दीन काजी (वय २०, रा. सुकळी) व मोहम्मद अरबाज मोहम्मद शफी (वय २२, रा. रहीमनगर, उमरखेड) यांचा समावेश आहे.

या सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०९(१), १०३(१) व ३(५) अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणातील उर्वरित फरार आरोपींच्या शोधासाठी उमरखेड व महागाव पोलीस स्टेशन स्तरावर स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून एलसीबीच्या मदतीने विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिग्रस पोलिसांची रंगीत तालीम

प्रतिनिधी २७ मे



**दिग्रस :** आगामी बकरी ईद तसेच अहिल्याबाई होळकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिग्रस पोलिसांकडून सोमवारी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम आणि शहरातून रूट मार्च काढण्यात आला. सायंकाळी ६.३० ते ७ वाजेदरम्यान आर्णी नाका व मोती नगर परिसरात दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी शहरातील विविध भागांतून रूट मार्च काढून नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश दिला.

रूट मार्चची सुरुवात दिग्रस पोलिस ठाण्यातून करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, कच्ची चौक, सागर हॉटेल, आर्णी नाका, मोती नगर, आंबेडकर नगर, गवळीपुरा, वहाब नगर, संभाजीनगर, शनी मंदिर चौक, दुर्गामाता चौक, बाराभाई मोहल्ला, मनोहर हॉटेल तसेच नगर परिषद परिसरातून मार्गक्रमण करण्यात आले. रात्री ८ वाजता रूट मार्चचा समारोप दिग्रस पोलिस ठाण्यात झाला. या उपक्रमात उपविभागीय पोलिस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी डॉ. तेजस सारडा यांच्यासह दिग्रस पोलिस ठाण्याचे अधिकारी, पोलिस कर्मचारी, एसआरपीएफ जवान आणि होमगार्ड सहभागी झाले होते. सणोत्सवाच्या काळात शांतता व सामाजिक सौहार्द कायम राखण्यासाठी पोलिस प्रशासन सतर्क असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. २७ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## उर्ध्व वर्धा जलाशयजवळील जमीन भाडेपट्टीसाठी अर्ज आमंत्रित

**अमरावती:** उर्ध्व वर्धा जलाशयाच्या सभोवतालची जमीन भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. उर्ध्व वर्धा जलाशयाच्या बुडीत क्षेत्राच्या काठाभोवतालची ३४२.५० मीटर ते ३४३ मीटर तलांकातील अमरावती जिल्ह्यातील २९८.२२ हेक्टर आणि वर्धा जिल्ह्यातील ३०.६० हेक्टर गाळपेर जमीन रब्बी हंगाम आणि तलांक ३४० मीटर ते ३४२.५० मीटरमधील अमरावती जिल्ह्यातील ८०६ हेक्टर आणि वर्धा जिल्ह्यातील ५३ हेक्टर जमीन दरवर्षी उन्हाळी हंगामाकरीता उपलब्ध होऊ शकते. ही गाळपेर जमीन भाडेपट्टीवर देण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. भाडेपट्टीचा दर हा जलसंपदा विभागाच्या पत्रानुसार एका वर्षात दोन पिके घेतली गेल्यास प्रति हेक्टरी २ हजार रूपये प्रति ११ महिन्यासाठी आणि एका वर्षात एकच पिक घेतले गेल्यास प्रति हेक्टरी १ हजार रूपये प्रति ११ महिन्यासाठी भरणे आवश्यक आहे, असे उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

# वादळी पावसामुळे अमरावतीत कोंडमोडली झाडे

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती :** २६/०५/२०२६ रोजी विविध ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडे पडल्याच्या घटना घडल्यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोळमोडली सायंकाळी ०५.३० वाजता फरशी स्टॉप आयुर्वेदिक दवाखान्याजवळ व कल्याण नगर येथे झाड पडल्याची माहिती सन्माननीय नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी दिली. किरण नगर गल्ली नंबर ६ येथे झाड पडल्याची माहिती अग्निशमन अधीक्षक यांनी फोन द्वारे दिली.

कवर नगर येथे चौरे मार्केटमध्ये एक झाड पडल्याची माहिती महेश मूलचंदानी यांनी दिली. फरशी स्टॉपङ नरहरी मंगल कार्यालय जवळ एक झाड पडल्याची



माहिती अजय विंचुरकर यांनी दिली.

मंगलधाम जवळ झाड पडल्याची माहिती अग्निशमन अधीक्षक यांनी दिली.

प्रशांत नगर हनुमान मंदिर जवळ झाड पडल्याची माहिती केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांनी दिली.

यशोदा नगर मटन मार्केट जवळ एक झाड पडल्याची माहिती सन्माननीय मेटे यांनी दिली.

लक्ष्मी नगर येथे एक झाड पडल्याची माहिती सन्माननीय अग्निशामक अधीक्षक अजय पंधरे यांनी दिली.

२६ मे २०२६ रोजी सायंकाळी ९ वाजेपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार एकूण आठ ठिकाणी झाडे पडल्याची माहिती अग्निशमन मुख्यालय येथे मिळाली आहे. सर्व घटना स्थळावर अग्निशमन विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी संबंधित घटनास्थळावर जाऊन पाहणी करून वादळी वाऱ्यामुळे पडलेले झाडे रस्त्यावरून बाजूला करून रहदारीसाठी रस्ते मोकळे करून दिले. सदर घटनेमध्ये कुठलीही जीवित व वित्तीय हानी झालेली नाही वरिष्ठांना माहिती सादर.

# अमरावती रामपुरी परिसरात बिबट्या शिरल्याची माहिती


प्रतिनिधी २७ मे

**अमरावती :** शहरातील मध्यभागी असलेल्या रामपुरी कॅम्प परिसरात बिबट्या शिरल्याच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. नागरिकांनी बघायची भूमिका घेतली आहे. घटनास्थळी मोठी गर्दी केली असून पोलीसही दाखल झाले आहे.

बंद असलेल्या दुकानात बिबट्या असल्याची माहिती आहे. लोक वस्तीत बिबट्या असल्याने नागरिक प्रचंड दहशतीत पसरली असून

घटनास्थळी मोठी गर्दी...

वन विभाग आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे. महापौर श्रीचंद तेजवानी , गटनेते चेतन गावंडे घटनास्थळी दाखल झाले असून वनविभागाच्या वतीने बिबट्याला जेरबंद करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



# पोलीस स्टेशन तिवसा येथे मोटर सायकल चोरी करणाऱ्यास अटक

### त्याच्या ताब्यातून गुन्हयातील चोरीस गेलेली मोटारसायकल तसेच एक मोबाईल जप्त

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती :** २७/०४/२०२६ रोजी पोलीस स्टेशन तिवसा येथे फिर्यादी अमोल बाबुरावजी गोहत्रे वय ३६ वर्ष रा. अमर चौक तिवसा यांनी रिपोर्ट दिला की, त्यांचे शेतमालक नामे मुकुंदराव हनुमंतराव देशमुख रा. अगर चौक तिवसा यांचे कडील एक हीरो होंन्डा डिलक्स कपनीची मोटर सायकल असुन त्याचा क. श्प्-२७ॅ-६६१९ असुन त्याचा इंजीन नं. इंजीन नं. ०५व्२९ं१३५४३ तसेच चेचीरा नं. ०५व्२९इ०७५०४ ही किंमत अंदाजे १५,०००/- रू. ची दि. २५/०४/२०२६ चे रात्री ०९:३० वा. ते दि. २६/०४/२०२६ चे सकाळी ०९:३० वा. दरम्यान समर्थ लॉन



तिवसा येथे हॅन्डल लॉक न करता लावुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरानी चोरून नेली आहे.

अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून पो. स्टे. तिवसा येथे अपराध क. २०८/२६ कलम ३०३ (२) ॅ.ऺ.ए. प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासात अज्ञात आरोपीचा गोपनिय माहीती वरून शोध घेवुन आरोपी नामे गावील जगदीश मोरे वय वय २४ वर्ष रा. शेंदुर्जना माहोरे ता. तिवसा जि. अमरावती यांस आज दि. २६/०५/२०२६ रोजी अटक करून त्यांचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेली एक हीरो होंन्डा डिलक्स कंपनीची मोटर सायकल क. श्प्-२७ॅ-६६१९ ज्याचा इंजीन नं. ०५व्२९ं१३५४३ तसेच चेचीस नं. ०५व्२९इ०७५०४ प्रमाणे किंमत अंदाजे १५,०००/- रू. तसेच एक ओपो कंपनीचा जुना वापरता मोबाईल फोन किं.अं. ८०००/- रू. चा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन पुढील कायदेशिर कारवाई सुरू आहे.

सदरवी कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड,उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग चांदुर रेल्वे अनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय ठाणेदार पो. स्टे. तिवसा, स.पो.नि. अमोल तुळजेवार, पो.उप.नि. अक्षय भागानगरे, पो.हे.कॉ. नितीन बौरसिया ब.नं. १७३७, पो.कॉ. शुभम गादेकर ब.नं. ६८०, पो.कॉ. नंदु जोगदंडे ब.नं. १६१६ नेमणुक पो. स्टे. तिवसा यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पो.हे.कॉ. नितीन बौरसिया ब.नं. १७३७ पो. स्टे. तिवसा हे करत आहे.

# हर्षवर्धन देशमुख व दिलीपबाबू इंगोले यांचा अमृत महोत्सवी सत्कार

### ♦ सेवाभावातून नेतृत्वापर्यंत एक अमृत प्रवास या संकल्पनेवर नेत्रदीपक सोहळा दिग्गजांची राहणार उपस्थिती, शिव परिवाराचे भव्य आयोजन

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती :** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारशाची जपणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख तथा कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

ठसेवाभावातून नेतृत्वापर्यंत एक अमृत प्रवासठ या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आल्याची माहिती शिव परिवाराच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

हॉटेल महफिल इन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत शिव परिवाराच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहून हजारो




विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचा प्रवास हा केवळ संस्थात्मक नेतृत्वाचा नसून सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जपणाऱ्या कार्यसंस्कृतीचा आदर्श मानला जातो. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात या दोनही नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण मा.खा. शरदचंद्रजी पवार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषणजी गवई, केंद्रीय मंत्री . ना. नितीनजी गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, राज्यमंत्री श्री.डॉ. पंकजजी भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंदजी तेजवानी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्यात हर्षवर्धनजी देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात येणार असून अनेक मान्यवर त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नाते असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.

# भूगर्भातील पाणी पातळी वाढवण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी उपाय योजना करा

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती:** जून महिना जवळ येऊन ठेपला आहे. भूगर्भातील पाणी पातळी, हा मुद्दा अधिक व्यापक कसा करता येईल, त्यासाठी हा प्रयत्न.

जल संचय करण्यासाठी सोपा आणि कमी गुंतवणूक आणि असणारा उपाय म्हणजे उंची वरून कमी उंची कडे वाहून जाणारे पाणी जमिनीचा उतार पाहून खालच्या बाजूला जलसंचय होऊन, ते जमिनीत मुरेल यासाठी टेकड्या आणि उतार पाट्या भागात शेततळे, खड्डे, जलसंचय भूपृष्ठ निर्माण करणे.

यासाठी शासकीय पातळीवर टेकड्या असणाऱ्या जमिनीवर आणि इतर संभाव्य जागा शोधून तिथे सालसंचय निर्माण करणे.

तेव्हा विविध सलग्न शासकीय विभागांचा मेळ घालून काय उपाययोजना करता, येतील त्यासाठी प्रयत्न व्हावेत, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

अर्थातच, निसर्ग आणि पर्यावरण प्रेमी संस्था ची मदत घेऊन हा प्रकल्प अधिक व्यापक करण्यासाठी सहकार्य पर्व राबवणे, सुद्धा गरजेचे आहे.

तेव्हा मार्गदर्शक भूमिका घेऊन कामाला गती द्यावी. पर्यावरण प्रेमी, पत्रकार, अभ्यासक, दानशूर मंडळी, यांना या अर्जाच्या प्रतिलिपी देतो आहे.

प्रदीप गावंडे, सरदेशमुख बाळासाहेब कोराटे, सुहास सोहनी, शाम चौकडे, दिलीप गणोरकर, राजाभाऊ हातागडे, दिलीप भाऊ डवरे, प्रा. एम टी ईमानदार प्रा. दीपक धोटे, सुभाष पाटील, लाजूरकर, ॲड. राजेंद्र गोरडे यांनी निवेदन दिले आहे.

# मतदारयाद्यांचे मॅपिंग तातडीने पूर्ण करावे

### अमरावती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती:** मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत अमरावती विधानसभा मतदारसंघात पूर्वतयारी सुरू आहेत. या अंतर्गत नागरिकांची २००२ मधील मतदारयादी आणि सध्याची मतदार यादी यांची आपापसात मॅपिंग करण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी संबंधित बीएलओंना भेटून मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


३८ - अमरावती विधानसभा मतदारसंघात अद्यापही २४ टक्के मतदारांचे मॅपिंग होणे बाकी आहे. त्यामुळे ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी तातडीने आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. ज्या मतदारांचे बीएलओंकडून मॅपिंग पूर्ण झाले आहे, त्यांची 'एसआयआर' प्रक्रिया अत्यंत सोप्या आणि सुरळीत पद्धतीने पार पडणार आहे. मात्र, ज्यांचे मॅपिंग झालेले नसेल, अशा मतदारांना या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी वेगवेगळी कागदपत्रे सादर करावी लागतील. हा त्रास टाळण्यासाठी मतदारांनी स्वतःहून पुढाकार घेणे गरजेचे आहे.

अनेक मतदारांची नावे मतदारयादीत दोन ठिकाणी असण्याची शक्यता असते. अशा मतदारांनी सध्या ते जेथे वास्तव्यास आहेत किंवा ज्या ठिकाणी त्यांना मतदानाचा हक्क हवा आहे, तेथील नाव कायम ठेवावे. तर दुसऱ्या ठिकाणचे नाव कमी करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी किंवा संबंधित बीएलओंकडे 'नमुना अर्ज क्र. ७' सादर करावा, अशी सूचनाही देण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेत सुलभता आणि अचूकता आणण्यासाठी नागरिकांनी आपल्या बीएलओंची भेट घेऊन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी.

# सुधाकर पाटील भारसाकळे यांचा शिवसेना शिंदे पक्षात जाण्याचा निर्णय

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती :** दर्यापूर कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन कॉँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ते कोणत्या पक्षात जाणार



हे अद्याप जाहीर केले नव्हते. मात्र आज दर्यापूर येथे माहेश्वरी भवन येथे यांनी कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन आपण कॉँग्रेस पक्ष सोडत असून शिवसेना शिंदे गटात आपण प्रवेश घेणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आमदार बच्चू कडू यांचे हात बळकट करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांनी कॉँग्रेसच्या नेत्यांना पंचवीस वर्षे घरी बसवले होते. मात्र दर्यापुरात मी कॉँग्रेस जिवंत ठेवून आतापर्यंत कार्य केले. असा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. मी कॉँग्रेस पक्षासाठी काय केले हे सर्वांनाच माहित आहे. भाषण देताना सुधाकर भारसाकळे गहिवरले सुद्धा आपला कॉँग्रेस पक्षात वरिष्ठ नेत्यांकडून अपमान होत होता ते सहन न झाल्याने आता हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी बँक खात्यांची अचूक माहिती द्यावी

### शाहू महाराज पुरस्कारासाठी ३१ मेपर्यंत संधी

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक आणि आयएफएससी कोड चुकीचे असल्याने त्यांच्या खात्यात अद्याप पुरस्काराची रक्कम जमा होऊ शकलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ३१ मेपर्यंत अचूक माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलबद्दल 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. विद्यार्थ्यांनी आपल्या मूळ अर्जात चुकीचे बँक खाते क्रमांक किंवा आयएफएससी कोड नमूद केल्यामुळे त्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास अडचण येत आहे.

याबाबत समाज कल्याण कार्यालयाकडून महाविद्यालयांना सूचना देण्यात आली आहे. परंतू महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांचे अचूक बँक तपशील समाज कल्याण कार्यालयाकडे जमा केलेले नाहीत. त्यामुळे महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यावर पुरस्काराची रक्कम त्वरित जमा व्हावी, यासाठी संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अचूक बँक खाते क्रमांक आणि आयएफएससी कोड दुरुस्त करून ३१ मे पर्यंत समाज कल्याण कार्यालयात संपर्क साधून ते जमा करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

# लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र सादर करा

### ३० सप्टेंबरपूर्वी सादर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती:** भातकुली तालुक्यामधील विविध विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी ३० सप्टेंबरपूर्वी ह्यात प्रमाणपत्र आणि दिव्यांग लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र वेळेत सादर करावे, असे आवाहन भातकुलीचे तहसीलदार अक्षय मंडवे यांनी केले आहे. विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी करण्यासाठी वर्षातून एकदा ह्यात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. केंद्र पुरस्कृत योजनेतील लाभार्थ्यांसाठी सरकारने बेनिफिशरी सत्यापन ॲप विकसित केले आहे.

लाभार्थी स्वतःच्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून ऑनलाइन पद्धतीने ह्यात प्रमाणपत्र मोफत सादर करू शकतात. स्वतःचा मोबाईल नसल्यास लाभार्थी आपल्या नातेवाईकांमार्फत किंवा गावातील ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायतमधील संगणक परिचालक, कर्मचारी यांच्या मदतीने हे काम पूर्ण करू शकतील. लाभार्थ्यांना सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रावर जाऊनही हे प्रमाणपत्र सादर करता येईल. येथे प्रक्रिया केल्यास ५० रूपये सेवा शुल्क द्यावे लागणार आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या नियमानुसार दिव्यांग लाभार्थ्यांना वैश्विक ओळखपत्र प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अनेक दिव्यांगांनी अद्याप प्रमाणपत्र मिळालेले नसल्याची बाब लक्षात घेऊन, दिव्यांग सक्षमीकरण विभागाने या प्रक्रियेला दि. ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

तालुक्याबाहेरील आणि स्थानिक पात्र लाभार्थ्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा मानधनात खंड पडू नये, यासाठी बेनिफिशरी सत्यापन ॲपवरून ह्यात प्रमाणपत्र त्वरित नोंदवावे. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र सादर करावे, असे आवाहन भातकुली तहसिलदार यांनी केले आहे.

# उर्ध्व वर्धातून खरीप सिंचनासाठी तीन पाणीपाळ्या प्रस्तावित

### शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २७ मे

**अमरावती:** उर्ध्व वर्धा प्रकल्पातून खरीप हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असल्यास तीन पाणीपाळ्या देण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी दि. ३१ जुलैपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उजवा मुख्य कालव्याच्या आरंभापासून ९५.५० किमीपर्यंत आणि डावा मुख्य कालव्याच्या ४२.४० किमीपर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशयावरील अधिसचित नदी, नाल्यांवरील लाभधारकांना खरीप हंगामासाठी पाणी देण्यात येईल. वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते तिथपर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार 'पुच्छ भागाकडून ते मुखाकडे' या तत्वानुसार सिंचन करण्यात येणार आहे.

खरीप हंगामात दि. १ जुलै ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत मागणीप्रमाणे तीन पाणी पाळ्या देण्यात येतील. कालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी-नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज नमुना क्र. ७ संबंधित शाखा कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. ते भरून दि. ३१ जुलैपर्यंत सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे.

मंजूर क्षेत्रासाठी कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचारी व विहिरीवरील शेतचारी यात तीन मीटरचे अंतर असावे. लाभक्षेत्रातील कालव्यापासून ३५ मीटर पर्यंतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या ऊस, कापूस, केळी व फळबाग या नगदी पिकांसाठी पाटबंधारे अधिनियमानुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५० टक्के दर लागू राहणार आहे. यासाठी उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभधारकांनी या बाबत योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि. २७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com



# फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●

- * पेरणी पुर्वी अनुदानाचे बियाणे मिळत नाही.
- * पेरणीसाठी बँक वेळेवर कर्ज देत नाही.
- * बियाण्यातून फसवणूक, कारवाई नाही
- * फसवणुकीनंतर मदतही नाही, न्याय नाही.
- * खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचत नाही.
- * हजारो तक्रारी करूनही दखल नाही.
- * अधिकारी सन्मानाची वागणूक देत नाही.
- * दुबार तिबार पेरणीच्या संकटात साथ नाही.
- * कागदावरच्या योजना प्रत्यक्षात भेटत नाही.
- * नुकसानीचे पंचनामे नाही, सर्व्हे नाही.
- * निसर्गासोबत अधिकाऱ्यांचीही साथ नाही.
- * पाणी आहे पण वीज मिळत नाही .
- * पीक विम्याची रक्कम मिळाली नाही.

## कृषी मंत्र्याच्या 'पालक' जिल्ह्यात...



# बळीराजावर अन्याय, कधी मिळणार न्याय !

## शासनाची 'अवकळा', जीवनाचा 'उन्हाळा'

सदैव संकटात नैसर्गीक संकटाबरोबर कृत्रीम संकाटाने बळीराजा दरवर्षी होरपळून निघत आहे. अतिवृष्टीमुळे हातचे आलेले पीक नष्ट झाले. शासनाने घोषीत केलेली मदत अद्यापही मिळाली नाही. जी मिळत आहे ती अत्यल्प आहे. पेरणी पूर्वी बळीराजाला अनुदानाचे बी बियाणे मिळत नाही. कृत्रीम खत टंचाईला सामोरे जावे लागते. त्यातच बोगस बियाण्यातून फसवणूक होते. दुबार तिबार पेरणीचे संकट ओढावते. एवढे करूनही ऐन हंगामाच्या तोंडावर आलेला हातचा आलेला घास नापिकीमुळे जाते. बोगस बियाणे प्रकरणी ५ हजार तक्रारी करून कारवाई नाही झाली आणि मदतही नाही झाली अतिवृष्टीचा सर्व्हे कागदावरच झाला. मात्र शासनाने जाहीर केलेली मदत वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळालाच नाही. या सर्व गोष्टीला जिल्ह्यातील अधिकारीच जबाबदार आहे. शासनानेही त्यावर कहरच केला. पीक विम्याचे पैसेही शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही. सोयाबीनचे अत्यल्प उत्पादन झाले. वरून शेतमालाचे भाव व्यापाऱ्यांनी पाडले. इतर जिल्ह्यात पीक विम्याचे पैसे मिळाले असतांना अद्यापही वाशीम जिल्ह्यातील शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत. शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने शासनाची अवकळा अन् जीवनाचा उन्हाळाच झाला आहे . कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच बळीराजावर अन्याय होत आहे. त्यामुळे न्याय कधी मिळणार अशी अपेक्षा बळीराज करीत आहेत.











# शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय, अधिकारी निष्क्रीय...

## खताची लिंकींग थांबवा, अन्यथा आंदोलन - दामुअण्णा इंगोले

बोगस बियाणे तथा बनावट रासायनिक खते माथी मारून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करणारी लुटारूंची टोळी पून्हा एकदा जिल्ह्यात सक्रीय झाली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तर अधिकारी निष्क्रीय दिसत आहेत. आज डिएपी खताची रेल्वेची रॅक आली असून खताबरोबर लिंकींग करून खते विकण्याच्या तयारीत लूटारू टोळी तयारीत आहे.

मागील वर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ प्रमुख दामुअण्णा इंगोले यांनी अरिहंत कंपनीच्या बोगस सुपर फॉसेट खंताविरोधात कृषी विभागाकडे केलेल्या तक्रारीने ही बाब उजेडात आणली होती. यावेळेस कृषी विभागाने वेळेवर सजगपणा न दाखविल्यास शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. बळीराजाने पेरणी पुर्व मशागत करून बी-बियाणे खरेदीला सुरूवात करणार आहे. त्यामुळे त्यांनी फसवणुकीपासून सावध राहावे. अगोदरच डिझेल टंचाईने शेतकरी हैराण झाला आहे. अनेक संकटाला तोंड देत जिल्ह्यातील शेतकरी आता शेतीच्या कामाला लागला असून चांगला पाऊस पडण्याचे संकेत दिल्याने बि-बियाण्याच्या खरेदीला सुरूवात केली आहे. त्यामुळे आजमितीा शेतकऱ्यांची मशागतीसोबतच खते व बियाणे खरेदी करण्याची लगबगही सुरू झाली आहे. नेमका याच लगबगीचा फायदा घेत बाजारात शेतकऱ्यांना लुटण्यासाठी काही लुटारुंची टोळी सक्रीय झाली आहे. अधिक पैसा कमविण्याच्या हव्यासातून सदर लुटारू बोगस बियाणे किंवा खते शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा गोरखधंदा या लुटारुंकडून सुरू असते. टिएल कंपनीच्या बोगस सोयाबीन बियाणे सुपर फॉस्फेट विक्रीतून हा बोगसपणा पून्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सदर कंपनीच्या मिश्र खतांचे नमुने गुणवत्ता तपासणीत निकृष्ठ असल्याचे समोर आले असतानाही त्याची विक्री सर्रास सुरू आहे.

तर शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी डीएपी खातासोबत नॅनो व सल्फर खाताची लिंकींग सुरू असून ती थांबविण्याची मागणी शेतकरी नेते दामुअण्णा इंगोले यांनी केली आहे. केंद्र सरकारच्या अनुदानानंतर खतांच्या किमती कमी झाल्या असतानाही काही दुकानदार वाढीव किमतीतच विक्री करीत आहेत. कृषी विभागाने हा सर्व प्रकार थाबविणे गरजेचे आहे.

## *निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी

### चार वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

कोरोनाच्या संकटात मागील चार वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. चार वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.



### बि-बियाणे व खतही मिळेना बँक पीक कर्जही देईना काय करावे कळेना...

कृतिम खत टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना अडचणीत आणून लूटण्याचे षडयंत्र आखणे सुरू आहे. बियाणे ही मिळेना, कर्ज जाहीर करूनही बँक पीक कर्ज देईना, बळीराजाला काय करावे कळेना, असे झाले आहे. निसर्गाची साथ साथ मिळत नसल्याने वारंवार संकटाचा सामाना करणाऱ्या बळीराजाला आता पुन्हा खत बि-बियाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. मान्सुन चांगला बरसनार असल्याने समाधानी असलेल्या शेतकऱ्यांना खतासाठी व बि-बियाण्यासाठी फिरावे लागत आहे. शेतीच्या बांधावर खते उपलब्ध करून देण्याची योजना कागदावरच आहे.













## थोडक्यात

### अतिरिक्त सीईओ किरण कोवे यांनी दिले, ३० दिवसात १०० गावे मॉडेल करण्याचे लक्ष्य !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावे ओडीएफ प्लस मॉडेल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांनी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला.

मागील सहा महिन्यापासून एकही गाव मॉडेल घोषित न झाल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ओडीएफ प्लस मॉडेल साठी आवश्यक असलेली प्रलंबित कामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांची सुनावनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# शालेय पोषण, विद्यार्थ्यांचे शोषण, भ्रष्ट शासन, काळ्या बाजारात राशन !

## २०१८ ते २०२५ वाशिम जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या ताटातील घासच गायब, पावत्यांमधील धक्कादायक तफावत उघड

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा संशय अधिक गडद होत असून, आता समोर आलेल्या पोहोच पावत्यांनी संपूर्ण प्रशासन हादरवून सोडले आहे. विद्यार्थ्यांना पोषण देण्यासाठी शासनाकडून पाठविण्यात आलेल्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचे धक्कादायक चित्र या कागदपत्रांतून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, एकाच शाळेसाठी, एकाच कालावधीतील आणि जवळपास एकाच स्वरूपाच्या पावत्यांमध्ये धान्याच्या वजनात प्रचंड फरक दिसून येत असल्याने हा प्रकार केवळ लेखनिक चूक नसून संगनमताने रचलेला 'शालेय पोषण आहार घोटाळा' असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. ' जगदंबा एंटरप्रायझेस बीड ' यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या पावत्यांमध्ये शासकीय तांदूळ वाहतुकीचे वेगवेगळे आकडे नमूद करण्यात आले आहेत. उपलब्ध पाच पावत्यांमधूनच तब्बल १००० किलोपेक्षा अधिक तांदळातील तफावत समोर आली आहे. ही धान्याची ही धान्याची तफावत नेमकी कुठे गेली? विद्यार्थ्यांच्या ताटातील घास कोणाच्या गोदामात पोहोचला? असा संतप्त सवाल आता वाशिम जिल्ह्यातील नागरिकांच्या मुखातून सूर धरू लागले आहेत. विशेष बाब म्हणजे सर्व पावत्यांवर संबंधित मुख्याध्यापकांचे माघारी खोट्या शिक्के व स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे या प्रकारात शाळांचे मुख्यध्यापक वगळता केवळ पुरवठादारच नव्हे तर काही अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. एकाच कालावधीतील दोन वेगवेगळ्या पावत्यांमध्ये एवढा मोठा फरक कसा? जर एक पावती खरी असेल तर दुसरी खोटी कोणाच्या सांगण्यावरून तयार करण्यात आली? आणि जर दोन्ही अधिकृत असतील तर शासनाची फसवणूक कोणी केली? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

तक्रारदारांनी हा केवळ सुरुवातीचा पुरावा असल्याचे सांगितले असून, अशाच प्रकारच्या शेकडो पावत्या, नोंदी आणि पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा केला आहे. जर या सर्व कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी झाली तर वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेतील मोठा भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



हा घ्या पुरावा...
तफावत असलेल्या पावत्या



मुख्याध्यापकांचे माघारी खोटे सह्या व शिक्षा मारून गायब करण्यात आलेला तांदूळ एका पावतीत : २१०० किलो तांदूळ तर दुसऱ्या पावतीत : १२५० किलो तांदूळ म्हणजेच : तब्बल ८५० किलो तांदळाचा फरक याचप्रमाणे दुसऱ्या संचातील पावत्यांमध्ये एका पावतीत ३५० किलो, तर दुसऱ्यात फक्त २०० किलो म्हणजे आणखी : १५० किलो तांदूळ गायब ङडाळी, मसाले आणि कडधान्यांमध्येही मोठा फरक एका पावतीनुसार :तूरडाळ - ७० किलो, हरभरा - ७५ किलो, मूगडाळ - १५० किलो, वाटाणा - १३५ किलो तर दुसऱ्या पावतीत : तूरडाळ - ५० किलो, हरभरा - ५५ किलो मूगडाळ - १०० किलो वाटाणा - ८५ किलो म्हणजेच : तूरडाळ २० किलो कमी, हरभरा २० किलो कमी, मूगडाळ ५० किलो कमी वाटाणा ५० किलो कमी इतकेच नव्हे तर मसाले, जिरे, मोहरी, हळद पावडर यामध्येही फरक असल्याचे दिसून येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. २७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जळगाव जामोद येथील कचरा डेपोला भीषण आग, परिसरात धुराचे लोट!

**जळगाव जामोद:** शहरातील व्यायाळ-देशमुख परिसरातील कचरा डेपोला शनिवारी सकाळी अचानक भीषण आग लागल्याने खळबळ उडाली. सकाळी १० ते ११ वाजेदरम्यान लागलेल्या या आगीत डेपोमधील कचरा, प्लास्टिक तसेच खताचे मोठे ढीग जळून खाक झाले. नगरपरिषदेने या ठिकाणी खतनिर्मितीसाठी लाखो रुपये खर्च करून मशीन उभारली होती. या यंत्राच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षात मोठ्या प्रमाणात खतनिर्मिती करण्यात आली होती; मात्र तयार झालेल्या खताची वेळेत विल्हेवाट न लावल्याने मोठ्या प्रमाणात साठा डेपोमध्येच पडून होता. त्यातच प्लास्टिक व कचऱ्याच्या ढिगांनाही आग लागल्याने संपूर्ण परिसर धुराने व्यापला. आग लागल्यानंतर परिसरात दाट धुराचे लोट पसरले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली.

# गावाच्या विकासासाठी सर्वपक्षीय शिष्ट मंडळाची जिल्हा मुख्यालयात धाव

प्रतिनिधी २७ मे

### पाणीपुरवठा, शिक्षण व आरोग्य प्रश्नांवर केली चर्चा



**खामगाव:** लाखनवाडा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी व प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी लाखनवाडा येथील सर्वपक्षीय इष्ट मंडळाने जिल्हा मुख्यालयात जाऊन विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. गावातील विविध समस्या मांडत त्या तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली.

गावामध्ये सध्या भीषण पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत संबंधित विभागाला वेळोवेळी निवेदने देऊनही अपेक्षित कारवाई होत नसल्याने शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर तक्रार दाखल केली. गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये कायमस्वरूपी मुख्याध्यापक पदाची नियुक्ती करण्यात यावी तसेच रिक्त असलेल्या विषय शिक्षकांची भरती नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी शिक्षण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. सिव्हिल सर्जन, बुलढाणा यांची भेट घेऊन ग्रामीण रुग्णालयातील विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले. रुग्णालयात आवश्यक औषधांचा मुबलक साठा उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, लाखनवाडा व परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली खामगाव-बाळापूर बससेवा पुन्हा सुरू करण्यात यावी, यासाठीही संबंधित परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच बंद असलेली लाखनवाडा-बाळापूर-उदयनगर बससेवा नियमित व सुरळीत सुरू करण्यात यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत बससेवा पुन्हा सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

या शिष्टमंडळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव पाटील, काँग्रेसचे संतरामजी तायडे, माजी सरपंच शेख अफरोज, माजी सरपंच विजय रायगावकर, समाजसेवक इब्राहिम सर, एजाज सर, वंचित बहुजन आघाडीचे सहदेव वाकोडे, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण संवर्धक, ग्रीनयोद्धा, युवा पुरस्कार प्राप्त, पत्रकार सुमित वाकोडे, माजी उपसरपंच प्रल्हाद हटकर आदी मान्यवरांचा समावेश होता.

गावाच्या विकासासाठी सर्वपक्षीय पातळीवर एकत्र येऊन प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## अमरावती-सुरत एक्स्प्रेस आता एलएचबी कोचसह धावणार!

### प्रवाशांना आरामदायी व सुरक्षित प्रवासाचा लाभ

प्रतिनिधी २७ मे

**नांदुरा:** रेल्वे प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अमरावती-सुरत एक्स्प्रेसच्या पारंपरिक आयसीएफ रेकऐवजी आता आधुनिक एलएचबी (लिंक हॉफमन बुश) कोचचा समावेश करण्यात येणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक २०९२६ अमरावती-सुरत एक्स्प्रेस ही अमरावती येथून दि. २९ मेपासून एलएचबी कोचसह धावणार आहे, तसेच गाडी क्रमांक २०९२५ सुरत-अमरावती एक्स्प्रेस सुरतयेथून दि. २८ मे पासून एलएचबी रेकसह सुरू होणार आहे. एलएचबी कोच हे पारंपरिक डब्यांच्या तुलनेत अधिक सुरक्षित मानले जातात. या डब्यांमध्ये प्रवासादरम्यान कमी धक्के बसतात, आवाज कमी होतो तसेच उच्च वेगातही स्थिरता अधिक राहते. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सुधारित रचनेत गाडीला एकूण १६ डबे असतील. यामध्ये १ वातानुकूलित चेअर कार, ४ द्वितीय श्रेणी चेअर कार, २ स्लीपर कोच, ७सामान्य द्वितीय श्रेणी डबे, १ लगेज सह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅनचा समावेश राहणार आहे.

## अनैतिक व्यवसायाच्या महाविर नगरातील संशयित अड्ड्यावर धडक कारवाई

प्रतिनिधी २७ मे

### चार संशयित ताब्यात; शहरात खळबळ, महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल




**मलकापुर:** शहराला लागून असलेल्या वाकोडी परिसरात अनैतिक देह व्यवसायावर बुलढाणा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने धडक कारवाई केल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर शहरातील काही भागांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून अनैतिक व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने केल्या जात होत्या. मात्र, या प्रकारांवर प्रभावी आणि सातत्यपूर्ण कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. अनेक वेळा सामाजिक संघटना व स्थानिक नागरिकांनीही अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी केली होती.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे एलसीबीच्या विशेष पथकाने वाकोडी परिसरातील एका संशयित ठिकाणी छापा टाकत ही कारवाई केली. पोलिसांनी अचानक धाड टाकल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन महिला व दोन पुरुष अशा चार संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

सदर कारवाईदरम्यान संबंधित ठिकाणाची झडती घेण्यात आली असून, काही महत्त्वाचे पुरावे पोलिसांनी ताब्यात घेतले असून एका महिलेसह संतोष हरीभाऊ वाघ वय ५१ ,उखर्डा पांडुरंग तांदुळकर वय ४७ या तिघांविरुद्ध अप.नं.४०५/२०२६ कलम ३,४,५ अनैतिक व्यापार (प्रतिबंधक) अधिनियम १९५६ (पिटा ॲक्ट) नुसार गुन्हा दाखल केला असून दोन महिला पिडितांसह त्यांचे ताब्यातून तिन मोबाईल किंमत तिस हजार, नगदी दोन हजार पाचशे रुपये, कंडोम पाकीट दोनशे दहा रुपये,मेकअ चे सामान किंमत चारशे पंचावन्न रुपये असा एकूण ३३१६५/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.दोघांना अटक केली असून पुढील तपास शहर पोलीस निरीक्षक गणेश गिरी करीत आहे.

## अधिकमासात धर्मासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

प्रतिनिधी २७ मे

### दसरखेड येथे श्रीमद्भागवत कथेत 'तेहतीस वृक्ष पूजन' उपक्रम



**मलकापुर:** अधिकमासाच्या पावन पर्वानिमित्त दसरखेड येथे सुरू असलेल्या श्रीमद्भागवत कथेमध्ये अध्यात्मासोबत पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देणारा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. गोवर्धन पर्वत पूजेच्या निमित्ताने तेहतीस वृक्षांची पूजा करून त्यांचे वाटप करण्यात आले असून, 'धर्मरक्षणासोबत निसर्गरक्षण' हा संदेश ग्रामस्थांना देण्यात आला.

२१ मेपासून ग्राम दसरखेडा येथे श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. श्रावण दगडू पाटील यांनी आपले वडील कै. दगडू गडबड पाटील तसेच आई गं. भा. सुभद्राबाई दगडू पाटील यांच्या पुण्यस्मरणार्थ या धार्मिक सोहळ्याचे आयोजन केले आहे. कथावाचनाची धुरा गुरुवर्य मनोहर देव महाराज सांभाळत असून, दररोज भागवत रसिकांच्या उपस्थितीत भक्तिरसाचा अविरत वर्षाव होत आहे.

अधिकमासात पारंपरिक स्वरूपात दानधर्म, अन्नदान किंवा विविध धार्मिक विधी केले जातात. मात्र दसरखेड येथे धार्मिकतेला सामाजिक जाणीवेची जोड देत पर्यावरण रक्षणाचा अभिनव विचार प्रत्यक्षात उतरविण्यात आला. गोवर्धन पर्वत पूजेच्या प्रसंगी वड, पिंपळ, कडुलिंब, बेल, औदुंबर यांसारख्या जीवनदायी वृक्षांची पूजा करून त्यांचे भाविकांना वाटप करण्यात आले. यावेळी प्रवचनात बोलताना मनोहर देव महाराज यांनी सांगितले की, 'आज मानवाने निसर्गावर अतिक्रमण केल्यामुळे उष्णतेत मोठी वाढ होत आहे. पर्यावरण संतुलन बिघडत चालले आहे. अशा वेळी प्रत्येकाने अधिकमासात किमान तेहतीस वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला, तर तोच खरा धर्मसेवा व ईश्वरसेवा ठरेल.'

त्यांनी पुढे सांगितले की, भारतीय संस्कृतीत वड, पिंपळ, औदुंबर, बेल या वृक्षांना धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. हे वृक्ष केवळ पर्यावरण समृद्ध करत नाहीत, तर जीवनसृष्टीच्या संरक्षणातही महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे ङ्गवृक्षवल्ली आम्हा सोयरेङ्क हा संतांचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

## विमा नसलेले वाहन रस्त्यावर चालविणे धोक्याचे!

प्रतिनिधी २७ मे

**खामगाव:** विमा नसलेले वाहन चालविणे हे धोकादायक असून, कायद्यानुसार ते दंडनीय आहे. अशा परिस्थितीत अपघात झाल्यास वाहनधारकास मोठा आर्थिक तसेच कायदेशीर फटका बसू शकतो. त्यामुळे वाहनाचा वैध विमा असणे आवश्यक आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील अनेक वाहनधारक विमा न काढता वाहने चालवित असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर आरटीओंमार्फत अशा वाहनधारका विरोधात कारवाई केली जात आहे.विम्याशिवाय वाहन चालवल्यास दंड भरावा लागतो. पहिल्या वेळेस दोन हजाराचा दंड किंवा ३ महिन्यांपर्यंत कारावास होऊ शकतो, तर दुसऱ्यांदा पकडल्यास दंड वाढू शकतो आणि कारावास देखील होऊ शकतो.अपघात झाल्यास, विमा कंपनी तुमच्या खर्चाची भरपाई करते. विमा असणे तुम्हाला शांत ठेवते आणि अपघाताच्या स्थितीत आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करते अपघात झाल्यास, विम्याशिवाय वाहन चालविल्यामुळे तुम्हाला कायदेशीर खटल्यांना सामोरे जावे लागू शकते.

आर्थिक नुकसान : अपघात झाल्यास, तुम्ही आणि तुमच्या गाडीचे नुकसान भरून काढण्यासाठी तुम्हाला मोठ्या खर्चाचा सामना करावा लागू शकतो.

## ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक राज; विकासकामे रखडली!

प्रतिनिधी २७ मे

**खामगाव:** ग्रामपंचायत निवडणुका रखडल्यामुळे जिल्ह्यातील तब्बल ५२५ ग्रामपंचायतींमध्ये सध्या प्रशासकीय कारभार सुरू आहे. बहुतांश ठिकाणी विद्यमान सरपंचांकडे प्रशासक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली असली, तरी अनेक गावांतील मूलभूत सेवा-सुविधांचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर येत आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती तसेच ग्रामविकासाच्या विविध कामांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून अनेक ग्रामपंचायतींमध्ये लोकप्रतिनिधींची नियमित निवड प्रक्रिया रखडल्याने प्रशासनामार्फत गावांचा कारभार चालविला जात आहे; मात्र प्रशासकीय पद्धतीत निर्णय प्रक्रियेला मर्यादा येत असल्याने विकासकामांच्या गतीवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या अनेक म्हणण्यानुसार, गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, स्वच्छता व्यवस्थाही ढासळली आहे. काही ठिकाणी रस्त्यांवरील दिवाबत्ती बंद असल्याने अवस्थेत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## ७ शेतकऱ्यांच्या बोरवेलमधील; २ हजार फूट केबल लंपास

प्रतिनिधी २७ मे

### जवळपास १ लाखाचे नुकसान

**खामगाव:** शेतात असलेल्या बोरवेलची केबल अज्ञात चोरट्याने लंपास केली. यामध्ये ७ शेतकऱ्यांच्या शेतातील जवळपास २ हजार फुट केबल लंपास करीत जवळपास एक लाखाचे नुकसान केले. सदर घटना २६ मे रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली असून याबाबत उद्धव रामकृष्ण आरज वय ५५ रा. किन्ही सवडत यांनी अमडापुर पोस्टेला तक्रार दिली आहे. नमूद केले की किन्ही सवडत शिवार कुसुंबीमध्ये ९ एकर शेती असून सदर शेतामध्ये मी पिकांना पाणी देण्यासाठी बोर घेतला होता.

सदर बोरवेलमध्ये मी इलेक्ट्रिक मोटर टाकली होती. त्याला ३५० फूट इलेक्ट्रिक वायर केबल जोडले होते २६ मे रोजी सकाळी ७ वाजताचे दरम्यान शेतात गेलो असता मला माझी बोअरवेलची मोटरचे केबल कापून नुकसान केलेले दिसून आले. तसेच माझ्या बाजूचे शेतकरी भास्कर देविदास चोपडे यांची ३५० फूट केबल, शेषराव उत्तम चोपडे यांची ४०० फूट केबल, भास्कर नथुजी आरज व दत्तात्रय भाष्कर आरज यांचे दोन्ही मिळून ३०० फूट केबल पुरुषोत्तम पुंडलिक बोराटे यांचे ३५० फुट केबल, गोविंदा शंकर मानकर यांचे १५० फूट केबल असे एकूण जवळपास २ हजार फुट महागडे वायर केबल अज्ञात व्यक्तीने कापून तोडून नेत जवळपास एक लाख रुपयाचे नुकसान झाले.

## मंदिरातील चोरीचा छडा

प्रतिनिधी २७ मे

**खामगाव:** जगदंबा देवी संस्थान (घाटपुरी मंदिर) येथे झालेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणी अकोला जिल्ह्यातील एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून ३ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.गेल्या वर्षी, म्हणजेच २४ डिसेंबर २०२५ च्या रात्री ९ ते २५ डिसेंबर २०२५ च्या सकाळी ६ वाजतादरम्यान अज्ञात चोरट्याने घाटपुरी येथील जगदंबा देवी मंदिराच्या खिडकीचे गज तोडून आत प्रवेश केला होता.

चोरट्याने मंदिरातील देवी आणि गणपतीच्या अंगावरील ७३,००० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४), ३०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. तपासादरम्यान तांत्रिक पुरावे आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. अमोल काशीराम तेलगोटे (३९, रा. रिधोरा, ता. जि. अकोला) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने चोरीची कबुली दिली.

## हभप प्रभाकरराव केवारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्य भागवत भक्ती महोत्सव

प्रतिनिधी २७ मे

**खामगाव:** ह.भ.प. वैकुंठवासी प्रभाकरराव बाबुराव केवारे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्य प्रभुव्दार निवास जिजाऊ पार्क, छत्रपती शिवाजी महाराज नगर, खामगांव येथे २६ मे पासून भव्य श्रीमद भागवत भक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. ह. भ. प. संजय महाराज पाचपोर, गुप्तेश्वर आश्रम, शिर्ला नेमाने हे आहेत तर भागवत कथा प्रवक्ते श्री. ह. भ. प. मंगेश महाराज वराडे, दाताळकर हे आहेत. या सप्ताहामध्ये दररोज महाराष्ट्रातील विविध नामवंत किर्तनकारांचे किर्तन होणार असून मंगळवार २६ मे रोजी ह. भ. प. तुकाराम महाराज, सखारामपुर, बुधवार २७ मे रोजी ह. भ. प. शिवा महाराज बावस्कार, गाडेगांव, गुरुवार २८ मे रोजी ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाघ, वारी हनुमान, शुक्रवार २९ मे रोजी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज, शनिवार ३० मे रोजी ह.भ.प. विशाल महाराज खोले, काकोडा, मुक्ताईनगर, रविवार ३१ मे रोजी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे, मानवत, सोमवार ०१ जून रोजी ह. भ. प. मंगेश महाराज वराडे, दाताळकर तसेच दि. २ जून रोजी ह. भ. प. संजय महाराज पाचपोर, गुप्तेश्वर आश्रम यांचे काल्याचे किर्तन सकाळी ९ ते १२ राहील.

सप्ताह दरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ काकडा आरती, दुपारी १ ते ५ श्रीमद् ?भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्री ८ ते १० श्रीहरी किर्तन असे कार्यक्रम होणार असून पुर्णाहुती अधिक वद्य मंगळवार ०२ जून रोजी होणार असून त्यानंतर दुपारी १२ ते ३ दरम्यान महाप्रसादाचे वितरण केले जाणार आहे. त्यापुर्वी सकाळी ८ ते ११ ग्रंथ दिंडी प्रदक्षिणा होणार आहे. या सप्ताहात गायन सम्राट ह. भ. प. अमोल महाराज माळेकर, आळंदी देवाची, गायन सम्राट ह.भ.प. संतोष महाराज संबळे, आळंदी देवाची व ताल सम्राट ह. भ. प. मंगेश महाराज जाधव, आळंदी देवाची हे देखील आपली सेवा देणार असून टाळकरी मंडळी - अंत्रज, उमरा, रामनगर, विहीगांव, घाटपुरी, किन्ही महादेव, दिवठाणा, हिवरखेड, व पंचक्रोशितील टाळकरी उपस्थित राहणार आहे. तरी सर्व धर्मानुरागी भाविकांनी श्री. ह. भ. प. वै. प्रभाकरराव बाबुराव केवारे यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्य केवारे परिवारा कडुन आयोजीत श्रीमद भागवत कथा तथा किर्तन महोत्सवास उपस्थित राहुन सप्ताहाचे शेवटचे दिवशी महाप्रसादाचा लाभ घ्यावा व आम्हास उपकृत करावे अशी विनंती आयोजक दिपक प्रभाकरराव केवारे, सचिन प्रभाकरराव केवारे, नितिन प्रभाकरराव केवारे, योगेश प्रभाकरराव केवारे तथा समस्त केवारे परिवार खामगांव यांनी केली आहे.

# शहरात थंड पेय व्यवसायात 'अखाद्य' बर्फाचा वापर

### अन्न व औषध प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

प्रतिनिधी २७ मे



शहरातील रसवंतीगृह, लस्सी सेंटर, बर्फगोळा विक्रेते, ज्यूस सेंटर तसेच थंड पेय व्यवसायिकांकडून वापरल्या जाणाऱ्या बर्फाचे नमुने तातडीने तपासणीसाठी पाठवून तो खाद्य आहे की अखाद्य याचा खुलासा करावा, तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांमधून होत आहे.

**खामगाव:** उन्हाळ्याच्या कडक तापमानामुळे सर्वसामान्य नागरिक थंड पेयांकडे मोठ्या प्रमाणात वळत असून शहरात रसवंतीगृह, बर्फगोळा, निंबूशरबत, लस्सी, मठ्ठा, कुल्फी तसेच विविध थंड पेय विक्री करणाऱ्या स्टॉलवर ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ, बसस्थानक परिसर तसेच नागरी वस्त्यांमध्ये अशा व्यवसायांची रेलचेल वाढलेली आहे.

मात्र या सर्व व्यवसायात वापरला जाणारा मुख्य घटक असलेल्या बर्फाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे शहरात विक्री होणाऱ्या थंड पेयांमध्ये आरोग्यास घातक असणाऱ्या 'अखाद्य' बर्फाचा वापर होत आहे काय ? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या माहितीनुसार खाद्य बर्फ तयार करण्यासाठी शुद्ध पाणी, स्वच्छ यंत्रणा आणि निर्जंतुकीकरण प्रक्रिया आवश्यक असते. तर अखाद्य बर्फ हा प्रामुख्याने मासेमारी, कोल्ड स्टोरेज, औद्योगिक वापर अथवा वस्तू थंड ठेवण्यासाठी तयार केला जातो. अशा बर्फात वापरलेले पाणी अशुद्ध असल्यास त्यातून पोटाचे विकार, टायफॉईड, कावीळ, अतिसार, उलट्या, घसा दुखणे, अशा विविध संसर्गजन्य आजार तसेच पचनसंस्थेचे गंभीर विकार होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी उघड्यावर ठेवलेला बर्फ, अस्वच्छ गोणपाट, प्लास्टिक किंवा गंजलेल्या हत्यारांनी फोडून वापरला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही विक्रेत्यांकडे बर्फ साठवणुकीची स्वच्छ व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरवर्षी दिवाळीच्या काळात खवा, बर्फाच्या मिठाई व खाद्यतेलाचे नमुने घेऊन तपासणी मोहीम राबविणारे अन्न व औषध प्रशासन उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या गुणवत्तेबाबत मात्र उदासीन असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. 'जिल्हास्तरीय कार्यालयात बसून केवळ कागदी कारवाई करण्यापेक्षा प्रत्यक्ष मैदानात उतरून तपासणी करावी,' अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. २७ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# जीवघेण्या उन्हामुळे एस टी महामंडळाच्या महसुलात दररोज लाख रुपयांची घट

## ♦ कडाक्याच्या उन्हामुळे अशात प्रवाशांची घटली संख्या

प्रतिनिधी २७ मे



**अकोला :** एरवी शाळांना सुट्ट्या लागल्या की सर्वांनाच मामाच्या गावाला जायची ओढ लागते. सुट्ट्या असल्यामुळे अनेक जण पर्यटनाचा किंवा देवदर्शनाचा बेत सुद्धा आखतात. त्यामुळे उन्हाळी सुट्ट्यात एसटी बस मध्ये प्रवाशांचे तौबा गर्दी पहावयास मिळते. त्यामुळे एसटी महामंडळाच्या तिजोरीत मोठी रक्कम जमा होते. परंतु गेल्या दहा दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या तीव्र उन्हाळ्यामुळे दररोज नवनवीन विक्रम नोंदवले जात आहेत. यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी संख्येत घट झाली आहे. विशेषतः दुपारच्या वेळी, जिल्हाअंतर्गत आणि लांब पल्ल्याच्या दोन्ही बसमधील प्रवासी संख्येत घट दिसून येत आहे. दुपारच्या वेळी अनेक बस रिकाम्या धावताना दिसत आहेत. जिल्ह्याअंतर्गत धावणाऱ्या बस फक्त सकाळी आणि संध्याकाळीच खचाखच भरलेल्या असतात. अकोला एसटी डेपोच्या माहितीनुसार, या डेपोमधून धावणाऱ्या बसमधून पूर्वी १६ ते १७ हजार प्रवासी प्रवास करत होते. परंतु यंदा मात्र प्रवाशांची संख्या दोन हजाराने घटलेली आहे.

पूर्वी प्रवासी दररोज प्रवास करत असत, पण गेल्या १०-१२ दिवसांत दोन ते तीन हजार प्रवाशांची घट झाली आहे. आता सरासरी १४ ते १५ हजार प्रवासी प्रवास करत आहेत

**भीषण उकाड्या मुळे प्रवाशांची संख्या घटली**

यामागे भीषण उकाडा हे एक प्रमुख कारण असले तरी, अधिक मास सुरू झाल्यामुळे विवाहसोहळयांसारखे शुभ कार्यक्रमांही बंद पडले आहेत. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मे महिन्यात प्रवाशांच्या संख्येत घट झाली आहे. दररोज ८ ते ९ लाख रुपयांचा महसूल मिळत होता. आता त्यातही घट होत आहे. सरासरी दररोज १ ते २ लाख रुपयांचे महसुली नुकसान होत आहे. १५ एप्रिलपासून प्रवासी भाड्यातही १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. प्रत्येक तिकिटावर दोन रुपयांचा स्वच्छता अधिभारही लावण्यात आला आहे. भाडे वाढल्यामुळे ही प्रवाशांची संख्या घटल्याची शक्यता वर्तवली जात आहे

**परिस्थिती पूर्ववत होण्याची आशा**

तीव्र उन्हामुळे प्रवासी केवळ अत्यावश्यक कामासाठीच एसटी बसने प्रवास करत आहेत. लांब पल्ल्याच्या आणि जिल्हाअंतर्गत दोन्ही बसमधील प्रवासी संख्येत घट झाली आहे. अधिक मासात लग्न आणि इतर कार्यक्रम नसल्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवाशांची संख्या कमी झाली आहे. येत्या काही दिवसांत परिस्थिती पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे.

**डेपो मॅनेजर, अकोला**

# सिटी कोतवाली शेजारील हायड्रंट सुकण्याच्या मार्गावर

## पाणी भरण्यासाठी टँकर चालकांना करावी लागतेय प्रतीक्षा

प्रतिनिधी २७ मे



**अकोला :** शहराचे तापमान ४५ अंशांच्या वर आहे. भीषण उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. तर दुसरीकडे शहरात ज्या हायड्रंटवरून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, तो हायड्रंटही आता सुकण्याच्या मार्गावर आहे. यामुळे शहरात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोमवारपासून नवतपा सुरू झाला असून तो २ जूनपर्यंत चालणार आहे. परंतु, त्याआधीच अकोला शहर ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाने होरपळून निघत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महान धरणाची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे. तर दुसरीकडे, शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागात ज्या हायड्रंटवरून पाणीपुरवठा केला जातो, तो हायड्रंटही आता सुकण्याच्या मार्गावर आहे. शहराच्या सिटी कोतवाली पोलीस स्टेशनच्या शेजारी असलेला हा हायड्रंट शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी, तसेच आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या गाड्या भरण्यासाठी वापरला जातो. आजवर उन्हाळ्याच्या दिवसांत हा हायड्रंट कधीच सुकला नव्हता. दिवस-रात्र शेकडो पाण्याचे टँकर भरल्यानंतरही या हायड्रंटमधून नियमित पाणीपुरवठा होत असे. मात्र, यंदाच्या भीषण उष्णतेमुळे हा हायड्रंटही आता दम तोडत आहे. एक टँकर भरल्यानंतर हायड्रंटमध्ये पुन्हा पाणी येण्यासाठी टँकर चालकांना अर्ध्या तासाहून अधिक काळ वाट पाहावी लागत आहे. शहरातील इतर भागांतील हायड्रंट सध्या बंद असल्याने सर्वच टँकर चालक याच हायड्रंटवर अवलंबून आहेत. मागच्या आमसभेत स्थायी समिती सभापतींनी शहरातील सर्व भागांत एकेक हायड्रंट सुरू करण्याचे निर्देश दिले होते, परंतु अद्याप एकही हायड्रंट सुरू करण्यात आलेला नाही. जर हा एकमेव कार्यरत हायड्रंटही बंद झाला आणि शहरात अचानक कुठे आग लागण्याची घटना घडली, तर आग विझवणे अत्यंत कठीण होऊन बसेल. हे पाहता, इतर भागांतील हायड्रंट त्वरित सुरू करणे ही काळाची गरज बनली आहे.

**हायड्रंट मधून अतोनात उपसा**

शहरातील विविध भागात टँकर द्वारे सिटी कोतवाली जवळील हायड्रंट मधून पाणी उपलब्ध होते. परंतु येथून वारेमाप उपसा होत असल्याने हायड्रंट आणण्याच्या स्थितीत आहे. या ठिकाणी पाणी उपसण्यासाठी बरेच टँकर उभे असतात. मात्र सध्या त्यांना पाणी उपलब्ध होण्यात अडचण येत आहे. या ठिकाणी असलेल्या विहिरीची पाणी पातळी खाली गेली आहे. तसेच वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवन देखील झपाट्याने होत आहे. त्याचा परिणाम दिसून येत आहे.

# शहरात बकरी ईदची जय्यत तयारी

## शांततेने आणि सलोख्याने ईद साजरी करण्याचे आवाहन



**अकोला :** शहरात बकरीद (ईद-उल-अजहा) गुरुवार २८ मे रोजी साजरी केली जाईल. ईदची नमाज सकाळी अदा केली जाईल. सर्व नमाजी आणि मुस्लिम समाजाला शांततेने आणि सलोख्याने ईदचा आनंद साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. शांतता आणि सलोखा कायम राहावा यासाठी पोलीस प्रशासनाने बंदोबस्ताची तयारी आधीच केली आहे. मुस्लिम समाजात बकरीदबद्दल मोठा उत्साह आहे. त्याची तयारी पूर्ण झाली आहे. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत, प्रत्येकजण ईदला नवीन कपडे घालण्यास उत्सुक आहे. मुले ईदची वाट पाहत आहेत. शहरात बकरी ईद ची मुख्य नमाज हरिहर पेठ परिसरातील ऐतिहासिक ईदगाहवर सकाळी अदा केली जाईल. ईद निमित्त या ऐतिहासिक ईदगाह ची सफाई मनपातर्फे युद्ध स्तरावर करण्यात आली आहे. संपूर्ण ईदगाह परिसराची रंगरंगोटी तसेच परिसराची सफाई टँकर लावून करण्यात आली आहे. संपूर्ण ईदगाह परिसरात बॅरिकेट्स उभारण्यात आले आहेत. बकरी ईद निमित्त मुस्लिम समाजातर्फे विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे शहरात सरबत चे


वाटपही केले जाईल. या काळात बंधुभाव आणि शांततेचा संदेश पसरवला जाईल.

# बेलखेड परिसरात फिरणारे अस्वल जेरबंद

## रात्री उशिरा अस्वलाला सोडले जंगलात

प्रतिनिधी २७ मे

**अकोला :** तेल्हारा तालुक्यातील बेलखेड गावाजवळील शेत परिसरात अस्वल शिरल्याने एकच खळबळ उडाली होती, अखेर या अस्वलाच्या ट्रक्युलाईज करून जेरबंद करण्यात वन विभागाला यश असले असून रात्री उशिरा अस्वलाला जंगलात सुखरूप सोडण्यात आले आहे.



मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला लागून असलेल्या तेल्हारा तालुक्यातील बेलखेड या गावाच्या शेतशीवारात एक अस्वल मुक्त संचार करीत असल्याचे काही शेतकऱ्यांना दिसून आले होते. यावेळी अस्वल पाहून शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे अस्वल एका माकडाचा पाठलाग करत असल्याचे काही नागरिकांनी सांगितले असून, पाण्याच्या शोधात ते परिसरात आले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अकोला वन विभागाला या बाबत माहिती मिळताच त्यांनी घटना स्थळ गाठीत पाहणी केली असता सदरचा अस्वल हा एका केळीच्या बगिच्यात असल्याचे त्यांच्या निर्देशनास आले. या अस्वलाच्या ताब्यात घेण्या साठी बुलढाणा येथील रेस्क्यू युनिटला पाचरण करण्यात आले. रेस्क्यू युनिटचे शूटर यांनी घटनास्थळी पोहोचून अस्वलावर ट्रक्युलायझर गणने अचूक निशाण साधत त्याला बेशुद्ध केले. यावेळी अस्वलाला वन विभागाच्या पथकाने ताब्यात घेऊन पशुवैद्यकीय अधिका ऱ्यांकडून त्याच्या प्रकृतीची तपासणी करीत त्याला रात्री उशिरा जंगलात सुखरूप सोडल्याची माहिती मिळाली आहे. सदरची कारवाई उप वन सवरक्षक सुमंत सोळंके, सहाय्यक वनसंरक्षक नम्रता टाले, अकोला वनपरिक्षेत्राधिकारी भगतराम कटारिया, अकोला व विभागाचे कर्मचारी, बुलढाणा रॅपीट रेस्क्यू युनिटच्या टीमने पार पाडली.

# अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा आज



**अकोला :** अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त अध्यक्षांच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन आज बुधवार, दि. २७ मे रोजी करण्यात आले आहे. हा सोहळा सायंकाळी ४ वाजता स्वराज्य भवन, अकोला येथे उत्साहात पार पडणार आहे.

या सोहळ्यात अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्त झालेले प्रकाश तायडे तसेच अकोला शहर काँग्रेस कमिटीच्या शहराध्यक्षपदी नियुक्त झालेले महेंद्र गवई पदभार स्वीकारणार आहेत. कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आ. साजिद खान पठाण यांच्यासह सर्व वरिष्ठ माजी पदाधिकारी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच जिल्हाभरातील काँग्रेस समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या पदग्रहण सोहळ्यानिमित्त काँग्रेस पक्षामध्ये नवचैतन्य निर्माण होणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणीला अधिक गती मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. कार्यक्रमासाठी ब्लॉक अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, अल्पसंख्याक काँग्रेस, अनुसूचित जाती काँग्रेस, सेवादल काँग्रेस तसेच विविध सेल व विभागांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# घराच्या खिडकीचे ग्रील कापून लाखो रुपयांचे दागिने लंपास

## जुन्या बायपास वरील घरात धाडसी चोरी

प्रतिनिधी २७ मे

**मूर्तिजापूर :** शहरातील कृषी व्यवसायीकाच्या जुन्या बायपास रोड वर घरात राहतात. काही दिवस अगोदर त्यांचा मोठा मुलगा रायपूर येथे स्थाईक होण्याकरिता जात असताना सर्व स्त्रीधन वडिलाकडे सुरक्षित ठेवण्याकरिता दिले होते. दागिने बँकेतील लॉकर मध्ये ठेवण्यास दोन तीन दिवस उशीर झाल्याने अज्ञात भामट्याने २२ ते २४ मे दरम्यान लोखंडी ग्रील कटर ने कापून घरात प्रवेश करून लाकडी कपाटात ठेवलेले सोने चांदीचे भांडे मिळून ८,३२,५०० चा ऐवजलंपास केल्याची फिर्याद २४ मे रोजी सिटी पोलिस ठाण्यात देण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार प्रकाश विजयकुमार सोमाणी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचा मोठा मुलगा आणि सून रायपूर येथे स्थाईक होण्याकरिता जात असताना त्यांच्या जवळील सोने चांदीचे दागिने अंदाजे किंमत ८,३२,५०० डॉ. दांपत्याने सुरक्षित ठेवण्याकरिता फिर्यादी जवळ देऊन निघून गेले. दरम्यान चोरांनी हात साफ केला.
















हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK